

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१८३ | मंगळवार दि.२२ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# केंद्राच्या मदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांना मदत करणार!

## दुष्काळ निवारणासाठी राज्य मंत्रिमंडळाने कार्यवाही सुरू केली; मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून मदत मिळण्याची प्रतीक्षा न करता राज्य सरकार शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पावले उचलत आहे. दुष्काळाच्या संदर्भात शेतकऱ्यांना कोणती मदत देता येईल, याबाबत राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू केली असून, केंद्राच्या मदतीपूर्वीच राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना मदत केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २१) दिली.**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मदतीबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. ''श्री गणेश हे विघ्नहर्ता आहेत. त्यांनी सर्व विघ्ने दूर करावीत. महाराष्ट्रात दुष्काळाचे विघ्न शेतकऱ्यांसमोर आहे. हे विघ्न दूर करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना दिलासा देता यावा, असा आशीर्वाद आणि शक्ती बाप्पाने आम्हाला द्यावी,'' अशी प्रार्थना गणरायाकडे केल्याचे फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील अनेक भागांत पावसाने मोठा खंड दिल्याने दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना



फडणवीस यांनी दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया आणि केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीबाबत स्पष्टीकरण दिले. दुष्काळाच्या प्रश्नावर विरोधी पक्षाने संवेदनशील भूमिका घ्यावी. या विषयाला 'इव्हेंट' म्हणून हाताळू नये, असेही त्यांनी म्हटले. एनडीआरएफच्या निकषांनुसार दुष्काळ जाहीर करण्यापूर्वी विविध प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. त्यासाठी काही कालमर्यादाही निश्चित करण्यात आल्या आहेत. ५ ऑक्टोबरनंतरचे पंचनामे ग्राह्य धरले जातील. त्यानंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला जातो आणि त्यानुसार केंद्राकडून

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### इटलीत बुरखा, नकाबवर बंदी घालणार

रोमः इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी शाळांमध्ये बुरखा आणि नकाबवर बंदी घालण्याची घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले की, मंत्रिमंडळ लवकरच याबाबत निर्णय घेईल. याशिवाय, शाळांमध्ये परदेशी विद्यार्थ्यांची संख्याही मर्यादित ठेवली जाईल. मेलोनी यांनी राजधानी रोममध्ये त्यांच्या ब्रदर्स ऑफ इटली पक्षाच्या युवा संघटनेच्या राष्ट्रीय महोत्सवात ही घोषणा केली. प्रस्तावित नियमांनुसार, ज्या परदेशी विद्यार्थ्यांच्या मुलांना शाळेत मिसळून जाण्यात अडचण येते, त्यांच्या पालकांना इटालियन भाषा शिकावी लागेल. कायदा लागू करण्यासाठी सरकारच्या मंजुरीनंतर तो ६० दिवसांच्या आत संसदेत मंजूर करून घ्यावा लागेल. सध्या फ्रान्स आणि चीनसह जगातील २४ देशांमध्ये बुरखा आणि नकाबवर बंदी आहे. संशोधन संस्था फोंडाजियोने करटवच्या माहितीनुसार, इटलीतील शाळांमध्ये सुमारे ९.३ लाख परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे देशातील शाळांमध्ये शिकणा-या एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत ११.६% आहेत. गेल्या १० वर्षांत इटलीतील परदेशी अल्पवयीनांची संख्या ४.५% घटली आहे.

### १९८० च्या मतदार यादीत सोनिया गांधींचे नाव

दिल्लीः राऊस व्हेन्यू न्यायालयाने सोनिया गांधी यांच्या विरोधात दाखल केलेली पुनरीक्षण याचिका मंजूर केली. नागरिकत्व न मिळवता बनावटगिरीद्वारे त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट केल्याच्या आरोपासंदर्भात ही याचिका दाखल करण्यात आली आहे. सोनिया गांधी यांच्या विरोधात दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे की, त्यांनी ३० एप्रिल १९८३ रोजी नागरिकत्व मिळवले, तर त्यांचे नाव १९८० च्या मतदार यादीत समाविष्ट होते. १९८० च्या नवी दिल्ली मतदार यादीत त्यांचे नाव कसे समाविष्ट केले गेले, असा प्रश्न याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. या याचिकेत असा आरोप करण्यात आला आहे की, सोनिया गांधी यांचे नाव १९८२ मध्ये मतदार यादीतून वगळण्यात आले आणि ते का वगळण्यात आले, असा प्रश्न उपस्थित केला. जर त्यांनी १९८३ मध्ये नागरिकत्व मिळवले असेल, तर त्यांचे नाव १९८० च्या मतदार यादीत कसे आणि कोणत्या कागदपत्रांच्या आधारे समाविष्ट केले गेले. बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आला होता का, असेही विचारण्यात आले आहे.

### धर्मस्थळ बलात्कार प्रकरणी पुन्हा चौकशीचे आदेश

दिल्लीः कर्नाटकातील उजिरे येथे २०१२ मध्ये १७ वर्षीय सौजन्यावर झालेल्या बलात्कार आणि हत्येचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. या प्रकरणाची नव्याने चौकशी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने धर्मस्थळ प्रकरणाची पुनर्तपासणी तीन महिन्यांत पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. ऑक्टोबर २०१२ मध्ये सौजन्यावर बलात्कार करून तिची हत्या झाल्यानंतर सुमारे १४ वर्षांनी हा आदेश आला आहे. या प्रकरणाचा तपास यापूर्वी कर्नाटक गुन्हे अन्वेषण विभागाने आणि नंतर केंद्रीय अन्वेषण ब्युरोने केला होता, परंतु तिच्या मृत्यूमागील गुन्हेगार अद्याप अज्ञात आहेत. बंगळूर-स्थित एशियननेट सुवर्णा न्यूजच्या वृत्तानुसार, सौजन्याच्या आई, कुसुमावती गौडा यांनी दाखल केलेल्या याचिकेनंतर सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१९ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ९७.५० क्विंटल** | | |
| २,५०१ | ३,१५० | २,८९२ |
| **ज्वारी/हायब्रिड: २१५.०० क्विंटल** | | |
| ३,४५० | ५,६०० | ४,२७९ |
| **मका/लोकल: ३२.०० क्विंटल** | | |
| २,७२४ | २,७२४ | २,७२४ |
| **तूर : ५.५० क्विंटल** | | |
| ४,००० | ८,५०० | ७,४३७ |
| **उडीद : ०.५० क्विंटल** | | |
| ७,७३० | ७,७३० | ७,७३० |
| **बाजरी: १०.०० क्विंटल** | | |
| २,८०० | ३,०४० | २,९१४ |
| **मुग: ६.०० क्विंटल** | | |
| ५,००० | १०,४५१ | ८,८२९ |
| **सोयाबीन: १०.०० क्विंटल** | | |
| ५,५०० | ५,९५० | ५,७१८ |
| **हरभरा: २.५० क्विंटल** | | |
| ५,५०० | ६,००० | ५,७३३ |

# राम मंदिर देणगी चोरीच्या १०५ घटना उघडकीस!

## सीसीटिव्हीच्या आधारे तपास अहवालाचा तपशील सुप्रीम कोर्टात सादर



दिल्ली । वृत्तसंस्था

अयोध्या येथील राम मंदिरात देणगी चोरीच्या १०५ घटना मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्या आहेत, अशी माहिती सोमवारी (दि. २१) सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आली. देणगी चोरीचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाच्या अहवालाचा संदर्भ देत सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च

▶▶ पान २ वर

# भूसंपादन घोटाळ्यानंतर पाठकांचा जलजीवन घोटाळा देखील रडारवर

बीड । प्रतिनिधी

धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गामध्ये संपादित झालेल्या जमिनीचा वाढीव मावेजा मिळावा यासाठी कोट्यावधी रुपयाचा अपहर झाल्या प्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक सध्या न्यायालयीन कोठडी मध्ये आहेत हे प्रकरण सध्या सुरू असतानाच त्यांच्याच कार्यकाळात तात्कालीन जिल्हा परिषदेचे सीईओ असताना जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठ्याच्या कामामध्ये



देखील कोट्यावधीचा अपहार झाल्याच्या संस्था वरून आता याची देखील चौकशी होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

बीड जिल्ह्यामधून जाणाऱ्या धुळे सोलापूर या राष्ट्रीय महामार्ग साठी शेतकऱ्यांच्या ज्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या त्या संपादित जमिनीचा मावेजा मिळाल्यानंतर पुन्हा वाढीव मावेजा मिळावा यासाठी लवादा पुढे काही रकमेची मागणी वकिलामार्फत करण्यात आली होती मात्र या प्रकरणी हा घोटाळा उघडकीस आल्यानंतर तात्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक करण्यात आली याप्रकरणी जवळपास ११ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. शेवटच्या क्षणी या सर्व प्रकारावर मंजुरीसाठी अंतिम सही करणारे

▶▶ पान २ वर

# मग मुख्यमंत्र्यांनाच बांधावर पाठवा, रोहित पवार मंत्र्यांवर संतापले

परभणी । प्रतिनिधी

**मंत्र्यांकडे निर्णय घेण्याचीच क्षमता नसेल, तर मग तुम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर फिरता कशाला? मुख्यमंत्र्यांनाच बांधावर पाठवा आणि निर्णय घ्यायला सांगा, अशा शब्दांत आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारमधील मंत्री आणि राज्यमंत्र्यांवर जोरदार निशाणा साधला आहे.**

परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी बांधावर गेलेल्या रोहित पवारांनी सरकारच्या मदत प्रक्रियेवरही सवाल उपस्थित केले. शेतकरी मंत्र्यांना किती मदत मिळणार, असा प्रश्न विचारतात; मात्र मंत्री 'मुख्यमंत्र्यांशी बोलतो, त्यांच्याकडून निर्णय घेऊ' असं सांगतात. त्यामुळे निर्णयच मुख्यमंत्र्यांना घ्यायचा असेल, तर मंत्री आणि राज्यमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर येतात कशासाठी, असा सवाल रोहित पवार यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच थेट शेतकऱ्यांच्या बांधावर आणा आणि त्यांनीच शेतकऱ्यांच्या मदतीबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. राज्यात एकीकडे पावसाने गेल्या महिनाभरापासून दडी मारल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. शेतातील पीकं वाळून गेली असून काही जिल्ह्यात शेतकऱ्यांनी चक्का पिकांवर नांगरणी केली आहे. रोटावेटर फिरवल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दुसरीकडे राज्यातील मंत्र्यांचे दुष्काळ पाहणी दौरे सुरू झाले असून,



▶▶ पान २ वर

# सीजेपीकडून आता झारखंडचे शिक्षणमंत्री टार्गेट !

## शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी अभिजित दीपके आक्रमक

भुवनेश्वर । वृत्तसंस्था

ओडिशातील शालेय पाठ्यपुस्तकांमधील गंभीर चुकांवरून विद्यार्थ्यांचे आंदोलन दिवसेंदिवस अधिक तीव्र होत असून, आता या संघर्षात राजकीय पक्षांनीही उडी घेतली आहे. अभिजित दीपके यांच्या 'कॉकरोच जनता पार्टी'ने (सीजेपी) थेट विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शवत, राज्याचे शालेय व जनशिक्षण मंत्री नित्यानंद गोंड यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे.

गेल्या काही दिवसांपासून 'नवनिर्माण युवा छात्र संघटना' (एनवायसीएस) या मुद्द्यावरून



रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहे. शालेय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा घडवून आणावी आणि पाठ्यपुस्तकांतील चुकांची जबाबदारी निश्चित करावी, अशी या विद्यार्थी संघटनेची प्रमुख मागणी आहे. या आंदोलनाची तीव्रता वाढवत

▶▶ पान २ वर

# आयआयटी मुंबईचे डीन सूर्यनारायण डुल्ला यांचे निलंबन

मुंबई । प्रतिनिधी

आयआयटी मुंबई येथे शिकणाऱ्या साहिल वाकोडे आत्महत्या प्रकरणी प्रशासकीय कामकाज विभागाचे डीन सूर्यनारायण डुल्ला यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी सूर्यनारायण डुल्ला यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून साहिलच्या मृत्यूप्रकरणात त्यांची चौकशी होणार आहे.

साहिल वाकोडेच्या आत्महत्येनंतर विद्यार्थ्यांनी मोठे आंदोलन केले होते. सलग तीन दिवस मुख्य प्रवेशद्वाराजवळ



विद्यार्थ्यांनी केलेल्या धरणे आंदोलनानंतर संस्थेच्या प्रशासनाने विद्यार्थ्यांनी मांडलेल्या १८ मागण्या मान्य केल्याचे समोर आले होते. विशेष म्हणजे घडलेल्या घटनेबद्दल संस्थेने माफीदेखील मागितल्याचे समोर आले आहे.

▶▶ पान २ वर

# महावितरणच्या बाह्यस्रोत कंत्राटी कामगारांचे पगार रखडले

## गौरी–गणपतीच्या सणातही वेतन न मिळाल्याचा आरोप; टेंडर संपल्यानंतर काम करून घेतल्याप्रकरणी चौकशीची मागणी

बीड । प्रतिनिधी

महावितरणमधील बाह्यस्रोत कंत्राटी कामगारांचे जुने कंत्राट ३१ जुलै २०२६ रोजी संपल्यानंतर नवीन टेंडर प्रक्रिया आणि कार्यारंभ आदेशाची स्थिती स्पष्ट नसतानाही संबंधित कामगारांकडून काम करून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कालावधीत एखाद्या कामगाराचा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची, तसेच कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने आणि कायदेशीर संरक्षण मिळणार का, असा गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. दरम्यान, गणपती आणि गौरी सणाच्या काळातही मागील महिन्याचे वेतन न मिळाल्याने कंत्राटी कामगारांमध्ये नाराजी असल्याचे सांगण्यात आले आहे.

यासंदर्भात नानासाहेब महादेव गुंजाळ आणि त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांच्या वतीने महावितरणच्या अधिकाऱ्यांसह कामगार आयुक्तांकडे निवेदन देण्यात आले आहे. संबंधित बाह्यस्रोत कामगारांचे कंत्राट ३१ जुलै रोजी संपले असताना त्यानंतरच्या कालावधीसाठी नवीन टेंडर प्रक्रिया नियमानुसार पूर्ण करण्यात आली होती का, याची चौकशी करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. जुने कंत्राट संपल्यानंतर पुढील कालावधीसाठी नवीन टेंडर कधी प्रसिद्ध करण्यात आले, निविदा प्रक्रिया कधी पूर्ण झाली आणि नवीन कार्यारंभ आदेश कोणत्या तारखेला देण्यात आला, याची माहिती तपासण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नवीन कार्यारंभ आदेश नसताना बाह्यस्रोत कामगारांकडून महावितरणचे

▶▶ पान २ वर

# लाडकी बहीण योजनेतून वगळलेल्या महिलांचा एल्गार; मंत्रालयावर धडक मोर्चाची घोषणा

डहाणू । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आलेल्या महिलांना पुन्हा योजनेत सहभागी करून घेण्यासाठी ऑल इंडिया डेमोक्रॅटिक वुमेन्स असोसिएशनने राज्यव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे. या मोहिमेच्या पहिल्याच दिवशी पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात झालेल्या महिला मेळाव्याला तीन हजारांहून अधिक महिलांनी उपस्थिती लावत सरकारविरोधात आवाज बुलंद केला.**



योजनेतून वगळलेल्या महिलांना पुन्हा लाभ मिळवून देण्यासाठी संघटनेने अर्ज भरण्याची मोहीम हाती घेतली असून, २० सप्टेंबरपासून राज्यभर महिला मेळावे घेण्यास सुरुवात केली आहे. २७ सप्टेंबरपर्यंत पालघर जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये मेळावे घेतले जाणार असून, त्यानंतर राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ही मोहीम विस्तारली जाणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. दरम्यान, या आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट करत संघटनेने मुंबईतील मंत्रालयावर संघर्ष मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या मोर्चात लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आलेल्या महाराष्ट्रातील हजारो महिलांना सहभागी करून घेण्यात येणार असल्याचे कडून सांगण्यात आले. डहाणूतील मेळाव्यात या घोषणेला महिलांनी मोठा प्रतिसाद दिल्याचे संघटनेने म्हटले आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण

▶▶ पान २ वर

### 'वगळलेल्या महिलांना पुन्हा लाभ द्या'

लाडकी बहीण योजनेतून वगळलेल्या महिलांचा प्रश्न केवळ आर्थिक मदतीपुरता मर्यादित नसून, पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळणे हा त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा असल्याचे संघटनेने म्हटले आहे. त्यामुळे तालुका पातळीवरील मेळाव्यांपासून सुरू झालेला हा संघर्ष आता जिल्हा आणि राज्य पातळीवर नेण्याची तयारी संघटनेने केली आहे. पालघरनंतर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महिलांचे मेळावे घेऊन वगळण्यात आलेल्या महिलांना संघटित केले जाणार असून, त्यानंतर मंत्रालयावर मोठा संघर्ष मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी संख्येत झालेली मोठी घट आता पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी येण्याची शक्यता आहे.

cmyk



## अग्रलेख

# महामदत पोर्टल बंद; मग शेतकऱ्यांच्या मदतीची वाट कधी मोकळी होणार?

महाराष्ट्रातील शेतकरी पावसाच्या खंडाने हैराण असताना दुष्काळ मूल्यांकनासाठी महत्त्वाचे असलेले 'महामदत' पोर्टल बंद असल्याचे वृत्त समोर आले आहे. पीक करपण्याच्या संकटात असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता प्रश्न उभा आहेसरकारी यंत्रणेचे महत्त्वाचे डिजिटल दारच बंद असेल, तर नुकसानाचे मूल्यांकन आणि मदतीची प्रक्रिया पुढे जाणार कशी?

धाराशिवसह मराठवाड्यातील अनेक भागांत पावसाचा दीर्घ खंड पडला असून, काही महसूल मंडळांमध्ये ३० दिवसांपेक्षा अधिक काळ पाऊस नसल्याची माहिती आहे. खरीप पिके धोक्यात असताना धाराशिव जिल्हा प्रशासनाने वस्तुनिष्ठ पीक पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. दुष्काळ मूल्यांकनात पर्जन्यमान, पावसाचा खंड, पिकांची स्थिती, जमिनीतील ओलावा आणि उपग्रहाधारित माहिती अशा विविध घटकांचा विचार केला जातो. या प्रक्रियेत 'महामदत'ची भूमिका महत्त्वाची असल्याने पोर्टल बंद असणे ही केवळ तांत्रिक अडचण मानून दुर्लक्ष करता येणार नाही. सरकारसमोर त्यामुळे काही थेट प्रश्न आहेत. पोर्टल बंद असताना पर्यायी व्यवस्था कोणती? उपग्रहाधारित माहिती कशी मिळवली जाणार? पोर्टल कधी सुरू होणार? आणि या अडचणीमुळे दुष्काळ मूल्यांकनाला विलंब झाल्यास त्याची भरपाई कशी केली जाणार? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारकडून शेतकऱ्यांसाठी मदतीचे निर्णय घेतले जात असतील, तर त्यांचा शेवट प्रत्यक्ष लाभात झाला पाहिजे. घोषणा, पंचनामा, मूल्यांकन, पात्रता आणि निधीवाटप या साखळीतील एकही कडी कमकुवत राहिली तर मदत कागदावरच अडकण्याचा धोका आहे. सध्याच्या अधिकृत निकषांनुसार नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी जिरायत पिकांना ८,५०० रुपये प्रति हेक्टर, कमाल दोन हेक्टरपर्यंत मदतीचा निकष आहे. बागायती पिकांसाठी १७ हजार, तर बहुवार्षिक पिकांसाठी २२,५०० रुपये प्रति हेक्टर असा निकष आहे. मात्र, ही मदत मिळण्यासाठी नुकसान आणि पात्रता अधिकृत प्रक्रियेत निश्चित होणे आवश्यक आहे. म्हणून सरकारने केवळ पोर्टल सुरू करण्याची प्रतीक्षा न करता पर्यायी यंत्रणा तातडीने कार्यान्वित करावी.

गंभीर पावसाच्या खंडाचा सामना करणाऱ्या भागांत पीक पाहणीला गती द्यावी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची माहिती पारदर्शकपणे संकलित करावी आणि मदतवाटपाची स्पष्ट कालमर्यादा जाहीर करावी. कारण शेतकऱ्याच्या शेतात 'सिस्टम डाउन'चा पर्याय नसतो. पाऊस थांबला की पीक कोमेजत जाते; मात्र कर्ज, उत्पादनखर्च आणि घरखर्च थांबत नाहीत. सरकारी यंत्रणेला ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन वेगाने निर्णय घ्यावा लागेल. महामदत पोर्टलची अडचण दूर करा, पर्यायी व्यवस्था उभी करा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत मदत वेळेत पोहोचवा. घोषणा नव्हे, तर प्रत्यक्ष आधारहीच आज शेतकऱ्यांची गरज आहे.

# आ.खोतकर व माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रयत्नामुळे सिटी बस सेवा सुरू




**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरातील नागरिकांचा दैनंदिन प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि सोयीस्कर व्हावा, यासाठी शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाची भर पडली आहे. माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे व आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष प्रयत्नातून जालना शहरात सिटी बस सेवा सुरू करण्यात आली असून, या बससेवेचा लोकार्पण सोहळा यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**

जालना शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीची अधिक सक्षम आणि परवडणारी सुविधा उपलब्ध व्हावी, शहरातील विविध भागांमध्ये प्रवास करताना नागरिकांना अडचणी येऊ नयेत, यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सिटी बससेवा सुरू करण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर जालना शहरात सिटी बससेवा सुरू करण्यात आली. शहरातील विविध भागांना जोडणाऱ्या या बससेवेमुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कर्मचारी, रुग्ण, व्यापारी तसेच दैनंदिन कामानिमित्त शहरात प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. सार्वजनिक वाहतुकीची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना प्रवासासाठी अधिक सोयीचा आणि परवडणारा पर्याय मिळणार असून, जालना शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. जालना ते इंदेवाडी, जालना ते रामनगर आणि जालना ते नागेवाडी* या मार्गांवर सिटी बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना विविध भागांमध्ये जाण्या-येण्यासाठी अधिक सुलभ वाहतूक सुविधा मिळणार आहे. यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, नागरिकांचा प्रवास अधिक सोयीचा व्हावा आणि त्यांना बससेवेचा जास्तीत जास्त फायदा मिळावा, यासाठी सिटी बससेवा सुरू करण्यात आली आहे. नागरिकांना बसप्रवासात आणखी सवलती कशा देता येतील, यासाठीही प्रयत्न करण्यात येणार आहेत. जालना शहरात या बसेस दिवसभर चांगल्या पद्धतीने सुरू राहाव्यात, नागरिकांना वेळेवर सेवा मिळावी आणि पुढील काळात प्रवाशांची वाढती गरज लक्षात घेऊन आणखी बसगाड्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार खोतकर यांनी सांगितले. सिटी बससेवेच्या संदर्भातील विषय आपण राज्याचे परिवहनमंत्री ना प्रताप सरनाईक यांचेकडे मांडला असता त्यांनी आपल्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देत सहमती दर्शविल्याचेही आमदार खोतकर यांनी यावेळी सांगितले. जालना जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करणार यावेळी माजी मंत्री रावसाहेब दानवे पाटील म्हणाले की, जालना शहरातील नागरिक आणि प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेली सिटी बससेवा निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. शहरातील विविध भागांमध्ये प्रवास करणाऱ्या नागरिकांना या बससेवेचा फायदा होईल. जालना जिल्ह्याच्या विकासासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या विचारांशी आणि प्रस्तावांशी आपण सहमत असल्याचे दानवे पाटील यांनी सांगितले. ''केंद्रात आपण एक आहोत, राज्यात आपण एक आहोत आणि जालना जिल्ह्यातही आपण एकत्रच आहोत,'' असे मत व्यक्त करत जालना जिल्ह्याच्या विकासासाठी समन्वयाने काम करण्याची भूमिका त्यांनी मांडली. लोकार्पण सोहळ्यानंतर *मा. मंत्री रावसाहेब दानवे पाटील आणि आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सिटी बसमधून सवारी करत बससेवेचा आनंद घेतला.* यावेळी दोन्ही नेत्यांनी जालना बसस्थानक ते गांधी चौका (चमन) पर्यंत बसमधून प्रवास केला. या प्रवासादरम्यान त्यांनी जालना आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत सिटी बससेवेबाबत माहिती घेतली. नागरिकांना नियमित, सुरक्षित आणि सुलभ बससेवा मिळावी, तसेच शहरातील विविध मार्गांवर बससेवेचा विस्तार करता यावा, याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. सिटी बसमधून प्रवास करताना रावसाहेब दानवे पाटील आणि आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. *जालना शहरातील नागरिकांसाठी सुरू झालेली ही बससेवा अधिक प्रभावीपणे सुरू राहावी आणि तिचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळावा, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यावर यावेळी भर देण्यात आला. यावेळी त्यांनी बससेवेची पाहणी करत अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. नागरिकांना चांगली, सुरक्षित आणि नियमित बससेवा मिळावी, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. जालना शहरातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन आगामी काळात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे आमदार खोतकर यांनी यावेळी सांगितले. या लोकार्पण सोहळ्यास माजी आमदार अरविंद चव्हाण, शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, युवासेना तेसचिव अभिमन्यू खोतकर, मनपा महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, नगरसेविका दर्शना झोल-खोतकर, , नियंत्रक विभागाचे वाहतूक विभागीय अधिकारी सुरेश टकले,आगार प्रमुख यांच्यासह जालना आगारातील अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जालना शहरात सिटी बससेवा सुरू झाल्यामुळे नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी अधिक सुलभ आणि परवडणारा पर्याय उपलब्ध झाला असून, शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत होण्यास या सेवेची मदत होणार आहे.

## पान १ वरून...

### केंद्राच्या मदतीची वाट न पाहता

मदत मिळते, असे फडणवीस यांनी सांगितले. मात्र, केंद्राच्या मदतीसाठी राज्य सरकार थांबलेले नाही. दुष्काळासंदर्भातील तांत्रिक प्रक्रिया सुरूच राहणार आहे. त्याचवेळी राज्याच्या मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांना कोणती मदत देता येईल, यासाठी कार्यवाही सुरू केली आहे. त्यामुळे केंद्राकडून मदत मिळण्याची प्रतीक्षा न करता राज्य सरकार शेतकऱ्यांना मदत करेल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या परिस्थितीवरून विरोधकांकडून शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही मुख्यमंत्र्यांनी केला. विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या काळातही दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती आणि त्यावेळीही याच प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला होता, असा दावा त्यांनी केला. ''सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. कोणाचीही वाट न पाहता राज्य सरकार मदत करेल,'' असे फडणवीस यांनी सांगितले. दरम्यान, राज्यातील शेतकरी कर्जमाफीच्या प्रक्रियेबाबतही मुख्यमंत्री फडणवीस यांनी माहिती दिली. कर्जमाफीची प्रक्रिया सुरू झाली असून आतापर्यंत तीन याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत. या याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा समावेश झाला आहे. उर्वरित याद्यांची प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्यात येईल. कर्जमाफीचे काम व्यवस्थित सुरू असल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

---------------

### भूसंपादन घोटाळ्यानंतर पाठकांचा

तात्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आजही ते न्यायालयीन कोठडीत आहेत छत्रपती संभाजी नगर खंडपीठामध्ये जामीन मिळावा म्हणून दोन वेळा केलेला अर्ज कोर्टाने फेटाळ आहे हे प्रकरण अद्याप सुरूच असताना जिल्हा परिषदेमध्ये सीईओ असताना बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात जलजीवन योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्याचे कामे सुरू होती अनेक ठिकाणी पाण्याचे स्रोत नसतानाही पाण्याच्या टाक्या गावात उभ्या केल्या गेल्या आणि कंत्राटदार अशी संगणमत करून शंभर टक्के कामे पूर्ण झालेली नसतानाही बीए के अदा केली गेली ही देखे त्यांच्याच कार्य काळामध्ये दिली गेल्याने आता या भूसंपादन घोटाळ्याबरोबरच जलजीवन मधील घोटाळा देखील रडारवर आहेत त्यामुळे आता या प्रकरणाची देखील चौकशी होण्याची शक्यता आहे यामध्ये पुन्हा काही अपहार आढळून आला तर पाणीपुरवठा विभागासह तत्कालीन सी ओ यांच्यावर देखील गुन्हा दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे याच कार्य काळामध्ये त्यांनी मोठ्या प्रमाणात दिले स्वतःच्या सहीने पास केली असल्याचेही बोलले जाते त्यामुळे सध्या तरी जेलमध्ये बसून अविनाश पाठाकावर चिंतन करण्याची वेळ आली असल्याचे दिसते.

-----------

### राम मंदिर देणगी चोरीच्या १०५

न्यायालयाला तपासाचा तपशील सादर केला. एसआयटीचा तपास अंतिम टप्प्यात असून, २५ सप्टेंबरपर्यंत आरोपपत्र (चार्जशीट) दाखल केले जाईल, अशी माहितीही सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयाला दिली. न्यायालयाने दंडाधिकाऱ्यांना (मॅजिस्ट्रेट) कायद्यानुसार आरोपपत्रावर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. कथित देणगी चोरीशी संबंधित प्रकरणाची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने एसआयटीच्या अहवालाचा आढावा घेतला. सुनावणीदरम्यान, आतापर्यंत झालेली अटक आणि देणगी चोरीबाबत गोळा केलेले पुरावे याबद्दल न्यायालयाला माहिती देण्यात आली; तसेच उपलब्ध पुरावे न्यायालयासमोर सादर करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांचे जबाब आणि इतर पुराव्यांशी संबंधित तपशीलही सादर करण्यात आले. आरोपींची ओळख पटवण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज आणि इतर साहित्याचे विश्लेषण कसे केले गेले, याचा तपशील या अहवालात नमूद करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सादर केलेली सर्व माहिती नोंदीवर घेतली आहे. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी एसआयटङी अहवालाच्या प्रतीची मागणी केली. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ती विनंती फेटाळून लावली. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले की, हे प्रकरण सत्र न्यायाधीशांच्या हातातून काढून घ्यायचे नाही; तसेच पुढील तपासाची आवश्यकता वाटल्यास आदेश दिले जातील, असेही त्यांनी नमूद केले. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करण्यापूर्वीच, 'ट्रस्ट'च्या विनंतीवरून राज्य सरकारने १३ जून रोजी लखनौचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत यांच्या नेतृत्वाखाली तीन सदस्यांची विशेष तपास पथक स्थापन केले होते. या समितीने २३ जून रोजी राज्य सरकारला आपला प्राथमिक अहवाल सादर केला होता, ज्यामध्ये अनेक कठोर शिफारसी करण्यात आल्या होत्या. या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या एफआयआरमध्ये अविनाश शुक्ला, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, मनीष कुमार यादव, करुणेश पांडे, रामाशंकर मिश्रा, सुभाष श्रीवास्तव आणि राम शंकर यादव ऊर्फ 'तिन्नू' या आठ जणांची, तसेच इतर अज्ञात व्यक्तींची आरोपी म्हणून नावे नमूद करण्यात आली होती. या सर्वांना अटक करण्यात आली असून, त्यांच्यावर 'भारतीय न्याय संहिता' आणि 'भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा' मधील संबंधित कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**लॉकरमधूनही पळविल्या वस्तू**

अहवालात स्पष्ट करण्यात आले की, मौल्यवान वस्तूंच्या पावत्या सॉफ्टवेअरद्वारे तयार केल्या. यानंतर त्या वस्तू स्टेट बँक ऑफ इंडियाच्या लॉकरमध्ये ठेवल्या गेल्या. एसआयटीच्या अहवालातून असे समोर आले की, सीसीटीव्ही फुटेजद्वारे देणगी चोरीच्या १०५ घटनांची ओळख पटली आहे.

-------------

### सीजेपीकडून आता झारखंडचे

एनवायसीएस आणि प्रमुख विरोधी पक्ष 'बीजेडी' यांनी संयुक्तपणे २२ सप्टेंबर रोजी ओडिशा विधानसभेला घेराव घालण्याचा इशारा दिला आहे. पार्टीच्या 'शाळा सुधारा' (स्कूल ठीक करो) मोहिमेचा भाग म्हणून सीजेपीचे सहसंयोजक सौरव दास हे सोमवारी भुवनेश्वर येथे दाखल झाले. त्यांनी थेट आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलक विद्यार्थ्यांशी संवाद साधला व पक्षाचा पाठिंबा जाहीर केला. यावेळी माध्यमांशी बोलताना दास यांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला. शालेय शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या या चुकांची जबाबदारी निश्चित करणे अपरिहार्य असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकांच्या छपाईवर तब्बल ३८० कोटी रुपये खर्च केले असूनही पुस्तकांमध्ये मोठ्या प्रमाणावर चुका आढळल्या आहेत. इतक्या प्रचंड प्रमाणात चुका समोर आल्यानंतर नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यायलाच हवा, असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला. या भेटीची माहिती देताना सौरव दास यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर एक पोस्ट शेअर केली आहे. पाठ्यपुस्तकांतील कथित गैरव्यवहार व अक्षम्य चुकांविरोधात आंदोलन आणि उपोषण करणाऱ्यांची भेट घेण्यासाठी ते पक्षाचे संयुक्त संघटन सचिव बालकृष्ण शुक्ला व ओडिशा सीजेपीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांसह उपस्थित होते. नवनिर्माण कृषक संघटनेचे संयोजक अक्षय कुमार आणि एनवायसीएसचे नेते मनवर अली यांच्या निमंत्रणावरून ते भुवनेश्वरला आले होते. हे दोन्ही नेते गेल्या दोन आठवड्यांहून अधिक काळापासून या मुद्द्यावर आमरण उपोषणाला बसले आहेत.

**आज घेराव आंदोलन...**

सौरव दास यांनी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी व तरुणांना २२ सप्टेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा घेरावामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. राज्यातील शिक्षण व्यवस्थेच्या ढासळत्या स्थितीबाबत विद्यार्थी आणि युवकांमध्ये तीव्र असंतोष खदखदत असल्याचा दावा त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या न्याय्य समस्या सोडवण्यात सरकार सपशेल अपयशी ठरले असून सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्यातही शासनाला अपयश आले आहे, असा घणाघाती आरोप त्यांनी केला. इतके दिवस विद्यार्थी रस्त्यावर आंदोलन करत असताना मुख्यमंत्री मोहन चरण माझी आणि शिक्षणमंत्री नित्यानंद गोंड यांनी आंदोलकांची भेट घेण्याचे साधे सौजन्यही का दाखवले नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

---------------

### मग मुख्यमंत्र्यांनाच बांधावर पाठवा,

बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला जात आहे. मात्र, अद्यापही शासनाकडून दुष्काळ निधी किंवा दुष्काळ जाहीर करण्यात आला नाही. तर, ५ ऑक्टोबरपर्यंत थांबावे, सर्वेक्षण सुरू आहे, असे शासनाकडून सांगितले जाते. त्यावरुन, आता आमदार रोहित पवार यांनी सरकारवर टीका केली. दुसरीकडे प्रशासकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने आमदार नितीन देशमुख यांनीही संताप व्यक्त केला. मंत्रालयात मंत्री आणि राज्यमंत्री मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी जातात, निवेदन देतात; मात्र मुख्यमंत्र्यांना त्यांच्याकडे ढुंकून पाहायलाही वेळ नाही, असा दावा करत त्यांनी सरकारमधील मंत्र्यांच्या निर्णयक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दरम्यान, दुष्काळ आणि पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी तातडीने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी रोहित पवार यांनी केली. मागील वर्षाचा प्रलंबित पीकविमा आणि यंदाचा पीकविमाही शेतकऱ्यांना पूर्णपणे मिळावा, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, चाऱ्याची उपलब्धता करावी आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही तातडीने सोडवावा, अशी मागणी रोहित पवारांनी केली. खासदार संजय जाधव यांना शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यापेक्षा काजू-बदाम खाण्यात अधिक रस असल्याचे दिसत आहे, असा टोला त्यांनी लगावला. दरम्यान, वाशिमचे निवासी उपजिल्हाधिकारी ऑन ड्युटी जेवायला गेल्याने शिवसेना कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. वाशिम शहरातील दुष्काळ जनआक्रोश मोर्चा नंतर ठाकरेंच्या शिवसेनेचे कार्यकर्ते जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी गेले असताना अधिकारी उपस्थित नसल्याने काही काळ तणाव पाहायला मिळाला. हजारो शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला असतांना अधिकारी मात्र कार्यालयात नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला. शेतकरी संकटात असतांना अधिकारी संवेदनशील नसल्याचा आरोप आमदार देशमुख यांनी केला. अखेर निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी दिलगिरी व्यक्त केली.

-----------

### महावितरणच्या बाह्यस्त्रोत कंत्राटी

नियमित काम करून घेतले असल्यास, ते कोणाच्या आदेशाने आणि कोणत्या अधिकाराने करण्यात आले, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. कंत्राटाची मुदत संपलेल्या कालावधीत कामगारांकडून काम करून घेतले असल्यास त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची होती, त्यांना आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यात आली होती का आणि अपघात झाल्यास नुकसानभरपाईसह कायदेशीर जबाबदारी कोणाची राहणार, याची स्पष्टता आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. केवळ टेंडरची मुदत संपली होती या कारणामुळे कामगारांना अपघाताच्या प्रसंगी कायदेशीर संरक्षण किंवा नुकसानभरपाईपासून वंचित ठेवता येऊ नये, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, गणपती आणि गौरी या सणांच्या काळातही बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना मागील महिन्याचे वेतन मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. सणासुदीच्या काळात वेतन रखडल्याने कामगारांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे वेतन रखडण्यामागील कारणे आणि त्यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित कंत्राटदार अथवा अधिकाऱ्यांचीही चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ३१ जुलै रोजी संपलेल्या जुन्या टेंडरची प्रत, त्याची वैधता, त्यानंतरच्या कालावधीतील नवीन निविदा प्रक्रिया आणि कार्यारंभ आदेश यांची कागदपत्रे तपासून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी. तसेच कंत्राटी कामगारांकडून नियमबाह्य पद्धतीने काम करून घेतले असल्याचे आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी मागणी नानासाहेब महादेव गुंजाळ यांनी केली आहे. निवेदनाच्या प्रती महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांसह कामगार आयुक्तांना देण्यात आल्या आहेत.

---------------

### आयआयटी मुंबईचे डीन सूर्यनारायण

साहिल वाकोडेच्या आत्महत्येनंतर विविध सामाजिक संघटनांकडून डुल्ला यांच्यावर निलंबनाची कारवाई व्हावी, अशी मागणी होत होती. अखेर पोलिसांनी डुल्ला यांच्याविरोधात गुन्हा दाखल केल्यानंतर मुंबई आयआयटीने डुल्ला यांच्याविरोधात निलंबनाची कारवाई केली. यावेळी त्यांच्यावर अॅट्रोसिटी तसेच आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईतील आयआयटीमध्ये शिकणाऱ्या यवतमाळच्या साहिल वाकोडे या विद्यार्थ्याने शुक्रवारी हॉस्टेलच्या रूममध्ये आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. तो एनर्जी इंजिनिअरिंगच्या द्वितीय वर्षात शिकत होता. निलंबनाची कारवाई केल्यानंतर आयआयटी मुंबईने एक अधिकृत३ निवेदन जारी केले. याद्वारे म्हटले की, साहिलच्या दुर्दैवी निधनाबाबतच्या परिस्थितीविषयी आम्ही आधी केलेल्या वक्तव्यांबद्दल माफी मागतो. या घटनेमागील परिस्थितीचा तपास योग्य प्राधिकरणांकडून सुरू आहे. तपास पूर्ण होण्याआधीच घटनेची माहिती आणि तपशील प्रसिद्ध करणे किंवा त्यावर भाष्य करणे अयोग्य होते, असेही म्हटले आहे.

-----------

### लाडकी बहीण योजनेतून वगळलेल्या महिलांचा

योजना सुरू केली. पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये देण्याची तरतूद या योजनेत करण्यात आली. सुरुवातीला लाभार्थी महिलांची संख्या मोठी होती. मात्र, त्यानंतर ई-केवायसी आणि पात्रता पडताळणीची प्रक्रिया राबविण्यात आली. जुलै २०२६ मध्ये अंतिम आकडेवारी समोर आल्यानंतर योजनेतील पात्र लाभार्थी महिलांची संख्या सुमारे १ कोटी ६६ लाखांवर आली. विविध अहवालांनुसार पूर्वीच्या लाभार्थी संख्येच्या तुलनेत सुमारे ९२ लाख महिलांची नावे कमी झाली आहेत. सरकारकडून ही कारवाई पात्रता निकष आणि ई-केवायसी पडताळणीच्या आधारे झाल्याचे सांगण्यात आले आहे. ई-केवायसी पूर्ण न करणाऱ्या तसेच योजनेच्या निकषांमध्ये न बसणाऱ्या लाभार्थ्यांची नावे कमी करण्यात आल्याचे सरकारी बाजूचे स्पष्टीकरण आहे. मात्र, असोसीयशनचा आरोप वेगळा आहे. पात्र महिलांनाही तांत्रिक अथवा किरकोळ कारणे देत योजनेच्या लाभापासून वंचित करण्यात आल्याचा दावा संघटनेने केला आहे. त्यामुळे वगळण्यात आलेल्या महिलांचे अर्ज पुन्हा भरून घेऊन त्यांना योजनेत समाविष्ट करण्यासाठी राज्यव्यापी संघर्ष उभारला जात असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. यावेळी मेळाव्यात असोसीयशनच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष मरियम धवळे, राज्य सरचिटणीस तथा राष्ट्रीय संयुक्त सचिव प्राची हातिवलेकर, जिल्हाध्यक्षा तथा राज्य उपाध्यक्षा लहानी दौडा आणि जिल्हा सचिव तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य सुनीता शिंगाडे यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

# वडवणी शिक्षक पतसंस्थेला प्रगतीच्या नव्या शिखरावर नेणार-चेअरमन सुनिल मुंडे

## सभासदहितासाठी घेतले अनेक ऐतिहासिक निर्णय; वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुका शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या.वडवणीची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि.२० सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे चेअरमन सुनिल मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या विशेष सभेत शिक्षक सभासदांच्या हिताच्या दृष्टीने विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.**



यावेळी बोलतांना चेअरमन सुनिल मुंडे म्हणाले की, सभासदांचे हित हेच संस्थेचे सर्वोच्च ध्येय आहे. सभासदांच्या आर्थिक गरजा लक्षात घेवून संस्थेच्या माध्यमातून अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न आहे. संस्थेची आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदांचा विश्वास या बळावर पतसंस्थेला आणखी सक्षम व प्रगतिपथावर नेण्यासाठी संचालक मंडळ कटिबध्द आहे. भविष्यातही सभासदांना अधिक चांगल्या कर्जसुविधा व विविध आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील असेही ते म्हणाले. या सभेस प्रमुख पाहूणे म्हणून केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर आळणे, केंद्रप्रमुख कृष्णा शिंदे व माजी केंद्रप्रमुख निलेश चव्हाण हे देखील व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच संस्थेचे सचिव प्रभाकर तिडके, उपाध्यक्ष श्यामराव मुळे, कोषाध्यक्ष राजुदास राठोड यांच्यासह संचालक बापू धनवे, मधुकर बादाडे, भागवत घुले, गोरक्षनाथ मुंडे, रोहिदास चव्हाण, तुकाराम राठोड, विठ्ठल सानप, विजयमालाताई सौंदरमल, आशाताई घुगे, सांगिताताई तिडके तसेच तालुक्यातील शिक्षक सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेमध्ये सभासदांच्या हिताच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये तातडीच्या कर्जाची मर्यादा ७५ हजार रुपये, तर दीर्घ मुदतीच्या कर्जाची मर्यादा १५ लाख रुपये करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला. तसेच आगामी १ तारखेपासून प्रत्येक सभासदाचे शेअर्स १ हजार ५०० रुपये आणि शिक्षक कल्याण निधी ५०० रुपये करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. संस्थेच्या सभासदांना त्यांच्या शेअर्सवर ९ टक्के लाभांश देण्याचेही सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले. विशेष म्हणजे यावेळी पतसंस्थेच्या स्विकृत सदस्यपदी सुधाकर घोडके व कैलास दुधाने यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या सभेत संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. सभासदांच्या हितासाठी घेण्यात आलेल्या या निर्णयांमुळे संस्थेच्या कामकाजाला अधिक गती मिळून सभासदांना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. दरम्यान चेअरमन सुनिल मुंडे, सचिव प्रभाकर तिडके तसेच संपूर्ण संचालक मंडळाने घेतलेल्या सभासदहिताच्या निर्णयांचे उपस्थित सभासदांनी स्वागत केले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सभेची सांगता आभार प्रदर्शनाने झाली.

cmyk

cmyk



## थोडक्यात

### चौसाळा येथील श्री गणेशाची आरती पत्रकार वाघमारे यांच्या हस्ते संपन्न

चौसाळा प्रतिनिधी, चौसाळा तालुका बीड येथील जय हिंद गणेश मंडळाच्या च्या श्री गणपती आरतीचा मान स्थानिक पत्रकार एन. टी. वाघमारे यांना देण्यात येऊन त्यांच्या सह त्यांच्या कुटुंबियांच्या हस्ते आरतीचा कार्यक्रम संपन्न झाला.



चौसाळा येथील प्रति वर्ष प्रमाणे येथील जय हिंद गणेश मंडळाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले याच कार्यक्रमात ह.भ. प. विष्णू महाराज बांडे याच्या भारूडाचा कार्यक्रम घेण्यात आला आज मंगळवार दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी. रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे तर गुरुवार दि २४ सप्टेंबर २०२६ रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या सर्व कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जय हिंद गणेश मंडळाच्या आले आहे.

### अजिंक्य शिराळे मातृभूमी प्रतिष्ठान कडून सन्मानित

बीड । प्रतिनिधी



मोरया सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने सालाबादप्रमाणे याही वर्षी जिल्ह्यातील सर्वात उंच १९ वा भगवाधारी गणेश मूर्तीची स्व:खर्चाने स्थापन करून रक्तदानासह, विविध सामाजिक उपक्रम राबवीत असल्याबद्दल मोरया सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अजिंक्य शिराळे यांचा मित्रनगर चौक येथे दि. २० सप्टेंबर २०२६ रविवार रोजी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी त्यांचा पुष्पगुच्छ,सन्मानपत्र देऊन समाज रत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला.यावेळी पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, संदीप उबाळे, अशोक शेजवळ,भगवान जाधव दिनेश ठेंगे,लक्ष्मण चाटे आदींची उपस्थिती होती.

### पद्मीनबाई बारवकर यांचे निधन

दिंद्रुड येथील ज्येष्ठ नागरिक पद्मीनबाई सखाराम बारवकर वय (८० वर्ष) यांचे सोमवारी (दि २१ सप्टेंबर) पहाटे ३ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सकाळी ११:३० वाजता शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात वारकरी संप्रदायातील तीन मुले,सूना, नातवंडे असा परिवार आहे.डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दिंद्रुड चे सहशिक्षक संजय बारवकर यांच्या त्या आई होत्या.



## प्रशिक्षणार्थी उपअधीक्षक भारत पांढरेंची धडकेबाज कामगिरी

# अवैध दारूविक्रीवर आष्टी पोलिसांचा दणका

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध देशी-विदेशी दारू विक्रीविरोधात पोलिसांनी शनिवारी (दि. १९) विशेष मोहीम राबवत विविध ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत पाच जण अवैधरीत्या दारू विक्री करताना आढळून आल्याचा पोलिसांचा दावा असून, त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) अन्वये पाच स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारवाईदरम्यान एकूण ५१ हजार ५१० रुपये किमतीचा देशी-विदेशी दारूसाठा जप्त करण्यात आला.

**किराणा दुकानातून दारू विक्री...**

पहिल्या कारवाईत आष्टी-बीड-सांगवी रोडलगत देसूर गावच्या शिवारातील शांताई किराणा दुकानात छापा टाकण्यात आला. येथे देसूर येथील अंकुश विठ्ठल आबनावे (वय ५०) हा अवैधरीत्या दारू विक्री करताना आढळून आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्याच्याकडून ९ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा क्रमांक ४२२/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

**हॉटेलमध्येही अवैध विक्री**

दुसऱ्या कारवाईत डोईठाण शिवारातील बीड-अहिल्यानगर रोडलगत असलेल्या हॉटेल तारांगण येथे छापा टाकण्यात आला. बावी, ता. आष्टी येथील अंकुश नारायण सांगळे (वय ४६) हा




**पाच जणांवर गुन्हे; ५१ हजार ५१० रुपयांचा देशी-विदेशी दारूसाठा जप्त**

अवैधरीत्या दारू विक्री करताना आढळून आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्याच्याकडून १० हजार ५०० रुपयांचा दारूसाठा जप्त करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा क्रमांक ४२४/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

याच परिसरातील हॉटेल संकेत येथे पोलिसांनी कारवाई केली. सांगवी पाटण येथील बद्रीनाथ रामहरी भोसले (वय ४६) याच्याकडून १२ हजार १० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ४२५/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

**सनी पॅलेस, हॉटेल जिव्हाळ्यावरही छापे...**

सांगवी पाटण शिवारातील बीड-अहिल्यानगर रोडलगत असलेल्या हॉटेल सनी पॅलेस येथे केलेल्या कारवाईत सचिन महादेव राजपुरे (वय ३१) याच्याकडून ९ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा क्रमांक ४२६/२०२६ दाखल करण्यात आला आहे.तर कारखेल बु.शिवारातील बीड-अहिल्यानगर रोडलगत असलेल्या हॉटेल जिव्हाळ येथे केलेल्या कारवाईत वैभव मोहन पवार (वय २३) याच्याकडून ९ हजार ७५० रुपयांचा दारूसाठा जप्त करण्यात आला. त्याच्या विरुद्ध गुन्हा क्रमांक ४२७/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई..

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि परीक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.कारवाईत पो.हे.कॉ क्षीरसागर, पो.हे. कॉ काकडे,पो.हे.कॉ शेख, पो.शि शेख,पो.शि लोंढे व पो.हे.कॉ भाग्यवंत यांनी सहभाग घेतला.आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारूची विक्री, वाहतूक व साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कायदेशीर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## मैदानी क्रीडा स्पर्धेत ट्विंकलिंग स्टार स्कूलची सुवर्ण कामगिरी

बीड । प्रतिनिधी

बीड येथे नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा २०२६-२७ मध्ये ट्विंकलिंग स्टार स्कूलच्या ण-१७ गटातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. विद्यार्थ्यांनी आपल्या वेग, ताकद, चपळता, तंत्रकौशल्य, जिद्द आणि आत्मविश्वासाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले.

विजेत्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

१०० मीटर धावणे-कादंबरी मोरे, गजानन होके, ४ ह्व ४०० मीटर रिले

कादंबरी मोरे,अश्लेषा घुले समीक्षा वाळे,श्रेया भडके





श्रावणी चोरमले, लांब उडी-श्रेया भडके,११० मीटर अडथळा शर्यत- अथर्व घुले, थाळीफेक-स्पर्श मैड, श्रीनिधी दर्फे, हातोडाफेक-उत्कर्ष भोंडगे, गोळाफेक-स्पर्श मैड, कादंबरी मोरे, उंच उडी-प्रांजली शिंदे , श्रेया भडके यांनी उज्वल यश संपादन केले. या उल्लेखनीय यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक दिनेश ढाकणे आणि कृष्णा उगलमुगले यांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रशिक्षण व सातत्यपूर्ण परिश्रम लाभले.

विद्यार्थ्यांच्या या शानदार कामगिरीबद्दल ट्विंकलिंग स्टार स्कूलचे चेअरमन गणेश मैड आणि प्राचार्य कृष्णनकुमार सी. एस. यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांना आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

शाळेचे उपप्राचार्य, सर्व शिक्षकवृंद, क्रीडा विभाग आणि प्रशिक्षकांनीही विजेत्या खेळाडूंचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे ट्विंकलिंग स्टार स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला आणि परंपरेला नवी झळाळी मिळाली असून, जिल्हास्तरीय स्पर्धेतही विद्यार्थी उत्कृष्ट कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पान ६ वरुन...

### दुष्काळ जाहीर करून

करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी.२. जनावरांसाठी तात्काळ चारा उपलब्ध करून द्यावा.३. सन २०२५ च्या खरीप व रब्बी हंगामाचा प्रलंबित पीकविमा तातडीने वितरित करावा.४. शेतीपंपांचे तसेच घरगुती वीज बिल संपूर्ण माफ करावे.५. शेतीपंपांसाठी किमान ८ तास अखंड वीजपुरवठा करावा.६. शेतकऱ्यांवर स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ बंद करावी.७. बीड जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी उसाचा दुसरा हप्ता तातडीने अदा करावा.८. केज शहरातील शेतकऱ्यांनाही ग्रामीण कृषी योजनांचा लाभ द्यावा. या प्रमुख मागणीसाठी मोर्चा होता, यावेळी हनुमंत भोसले, डॉ हनुमंत सौदागर,प्रकाश भन्साळी, राहुल खोडसे, राष्टपाल पाटुळे, अक्षय भुंबे या वेळी शेकाप महिला आघाडीच्या शिवकन्या गुंड सविता आकुसकर, शेकापचे भाई अशोक रोडे शंभुराजे पाटील, ॲड निखिल बचुटे हभप अशोक महाराज, मंगेश देशमुख, महेश गायकवाड बालु भासले, दिगंबर मगर,धनराज भासले दिनकर बप्पा कदम, अनिल नखाते, विनोद आगलावे, किशोर सुरवसे, मुस्तक शेख, गोविंद गुंड, दादा हास्वले बाबुराव जाधव दिगाबर गुंड महिला यांनी मोर्चा यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

### अमली पदार्थांच्या विळख्यातून

समाजसुधारणेच्या कामात हिरिरीने पुढे यावे. विद्यार्थ्यांना व्यसनाधीन बनवणाऱ्या प्रत्येक समाजकंटकाविरुद्ध एकजूट होऊन सक्त कायदेशीर कारवाया करण्याचे निर्देश त्यांनी दिले.अमली पदार्थांचे सेवन तरुण पिढीला उद्ध्वस्त करत असून, याला वेळीच वेसण घालण्यासाठी पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभागाने समन्वय साधून संयुक्त मोहीम राबवावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या बैठकीत केले.

### गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर

गणेश मंडळांनी आणि नागरिकांनी उत्सवाच्या काळात पोलिसांना सहकार्य करावे. देखावे पाहताना शिस्त पाळावी, गर्दीच्या ठिकाणी काळजी घ्यावी आणि कोणत्याही संशयास्पद अथवा अनुचित प्रकाराची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### सत्ताधारी गटातील दोन माजी

लक्ष वेधण्यासाठी रस्त्यावर उतरत असल्याने या आंदोलनाकडे राजकीयदृष्ट्याही पाहिले जात आहे.

**धसांकडूनही शासनदरबारी पाठपुरावा**

दरम्यान, मतदारसंघाचे विद्यमान आमदार सुरेश धस हे आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करीत असल्याचे त्यांच्या भूमिकेतून सांगण्यात आले आहे.

पावसाअभावी खरीप पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, ग्रामीण भागात टँकरची आवश्यकता, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न तसेच शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी, यासाठी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच कृषिमंत्र्यांशी चर्चा करून उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येत असल्याचे सांगत यावर राज्य सरकार लवकरच उपाययोजना राबविण्याबाबत सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले आहे.त्यामुळे एकीकडे विद्यमान आमदारांकडून सरकारदरबारी पाठपुरावा, तर दुसरीकडे त्याच सत्ताधारी आघाडीतील दोन माजी आमदारांकडून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, असे चित्र आष्टी विधानसभा मतदारसंघात निर्माण झाले आहे. दि.२८ सप्टेंबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर होणाऱ्या या मोर्चातून नेमक्या कोणत्या मागण्या मांडल्या जातात आणि शासन त्याची कशी दखल घेते, याकडे आष्टी विधानसभा मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.दरम्यान, सत्ताधारी आघाडीतील दोन माजी आमदारांनीच सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मोर्चा काढण्याची भूमिका घेतल्याने सरकार दरबारी नेमके ऐकले जात नाही का? हा सवाल मात्र आष्टीच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

### श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय

२० वर्ष असुन वजन ७५ किलो वजन गट व कुमारी गटा साठी वयोमर्यादा २० वर्ष असुन वजन ६५ किलो वजन गटाची मर्यादा आहे.खेळाडूंनी सोबत मॅट शूज असणे आवश्यक आहे.याची सर्व खेळाडूनी नोंद घ्यावी. सर्व क्रिडामंडळे व खेळाडू व प्रशिक्षकांनी सकाळी ठिक ९:३०वाजता मैदानावर उपस्थित राहावे. असे बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन च्या वत्तीने कळविण्यात आले आहे.

तरी या अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत जास्तीत जास्त क्रिडा मंडळानी व खेळाडूनी सहभाग नोंदवावा असे आव्हान महाराष्ट्र राज्य कबड्डी सोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष माजी आमदार.श्री. अमरसिंह शिवाजीराव पंडित,तसेच बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष मा. आ.श्री.विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी केले आहे

### बीडसह पाच तालुक्यांतील

कृषी विभाग, बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे चौकशीची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्यावर अद्याप अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.दरम्यान, चौकशी पूर्ण होईपर्यंत तालुक्यांमधील लाभार्थ्यांना वितरित होणारा संबंधित निधी वितरित करू नये, अशी मागणीही करण्यात आली आहे. अन्यथा अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.या वेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके युवक जिल्हाध्यक्ष भागवत मस्के जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर कवचट बीड जिल्हा चिटणीस बापुसाहेब कोलगडे बीड जिल्हा उपाध्यक्ष बापूसाहेब मराठे बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## लोकसंवाद मोहिमेअंतर्गत बीड शहरात स्पर्धा परीक्षा, पोलीस भरती व सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन

बीड । प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरात 'लोकसंवाद' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून बीड शहरातील आदर्श गणेश मंडळ (आदर्श नगर), हिंदवी स्वराज्य सार्वजनिक उत्सव समिती (श्रीराम नगर रोड) आणि ज्ञानज्योत गणेश मंडळ (चराटा फाटा) येथे मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी उपस्थित नागरिक, तरुण वर्ग आणि विशेषतः विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.




मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून कठोर परिश्रम करण्याचे आवाहन केले. स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, वेळेचे नियोजन कसे असावे आणि यशासाठी सकारात्मक दृष्टिकोन कसा ठेवावा, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाच्या टिप्स दिल्या. तसेच पोलीस दलात दाखल होऊन देशसेवेची इच्छा बाळगणाऱ्या तरुणांसाठी पोलीस भरतीच्या तयारीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यादरम्यान शारीरिक क्षमता चाचणीसोबतच लेखी परीक्षेसाठीचा नियमित सराव किती महत्त्वाचा आहे, हे त्यांनी स्पष्ट केले.

आजच्या डिजिटल युगात वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांवर विशेष भर देत त्यांनी उपस्थितांना सावध केले. ऑनलाईन फ्रॉड, लॉटरीच्या नावाखाली येणारे बनावट मेसेज, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि स्वतःची गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तींसोबत शेअर न करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे महत्त्व त्यांनी उपस्थितांना पटवून दिले. गणेशोत्सवाच्या पवित्र वातावरणात धार्मिक कार्यक्रमांसोबतच अशा प्रकारच्या प्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल नागरिक व युवकांनी पोलीस प्रशासन आणि जिल्हा माहिती कार्यालयाचे आभार मानले.

## बँक कॉलनी नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राच्या जन आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक शरद यादव



माजलगाव । प्रतिनिधी

बँक कॉलनी येथील नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राच्या जन आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक शरद यादव यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यविषयक प्रश्नांना प्रभावीपणे मांडण्यासाठी एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच केंद्रातील आवश्यक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी समितीच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येणार आहे. नागरिकांच्या आरोग्यविषयक अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी संबंधित आरोग्य विभागाशी समन्वय साधण्यात येणार असल्याचे नगरसेवक शरद यादव यांनी सांगितले. तालुका आरोग्य अधिकारी श्री. मधुकर घुबडे व डॉ. झिंजूरके साहेब पत्रकार तानाजी सिरसट सय्यद जमील भाई यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.

स्वामी विवेकानंद नगर, श्रीकृष्ण नगर, सिद्धेश्वर नगर, स्वाभिमानी नगर, समता कॉलनी, पंचशील नगर व दत्त कॉलनी या भागातील नागरिकांनी बँक कॉलनी येथील नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रातील उपलब्ध आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा त्यांच्या जवळच्या परिसरात सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी जन आरोग्य समितीच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जाणार आहेत. नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत केंद्र अधिक सक्षम करण्यासाठी आपण पुढाकार घेऊ, असे नगरसेवक शरद यादव यांनी सांगितले.

# गणराय जिल्हा परिषदेत अवतरले!

## जिल्हा परिषद शाळांच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे काय झाले? जाब विचारण्यासाठी लक्ष्यवेधी आंदोलन

बीड । प्रतिनिधी

मान्सूनच्या आगमनापूर्वी राज्यातील सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिले होते. १५ मेपूर्वी शाळांच्या इमारती, भेगा पडलेल्या भिंती, सैल झालेले प्लास्टर, कमकुवत छत, गळती होणारे छत, खिडक्या-दरवाजे, वर्गखोल्या, स्वयंपाकगृहातील गॅस जोडणी, धूर बाहेर काढण्याची व्यवस्था, इंधन साठवणूक, स्वच्छतागृहांसह २७ मुद्यांची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, या आदेशांची बीड जिल्ह्यात कितपत अंमलबजावणी झाली, याचा जाब विचारण्यासाठी सोमवारी दि. २१ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद कार्यालयात लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

केज तालुक्यातील लव्हुरी केंद्रांतर्गत तरनळी येथील सानप वस्तीवरील जिल्हा परिषद शाळेचे छत मध्यरात्री कोसळल्याची घटना घडली. ही घटना रात्री घडल्याने सुदैवाने विद्यार्थ्यांची उपस्थिती नसल्यामुळे जीवितहानी टळली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शाळांच्या इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी गणरायाची वेशभूषा परिधान करून मोडकळीस आलेल्या जिल्हा परिषद शाळांची छायाचित्रे असलेले फलक हातात घेत हे अनोखे लक्ष्यवेधी आंदोलन केले. यावेळी गणरायाची आरती करून प्रशासनाला सुबुद्धी देण्याची आणि गोरगरीब विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली.ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या मोडकळीस आलेल्या इमारती, अपुऱ्या मूलभूत सुविधा, पिण्याच्या पाण्याची समस्या आणि स्वच्छतागृहांची दुरवस्था याबाबत ग्रामस्थांकडून वारंवार प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.




मात्र, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अद्याप कायम असल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले.

शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट प्रत्यक्षात झाले का? झाले असल्यास धोकादायक इमारतींची संख्या किती, त्यापैकी किती इमारती दुरुस्त करण्यात आल्या आणि किती शाळांच्या पुनर्बांधणीची आवश्यकता आहे, याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**गणराया, प्रशासनाला सुबुद्धी दे!**

मोडकळीस आलेल्या शाळांच्या इमारतींची तातडीने पाहणी करून विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या इमारतींची दुरुस्ती अथवा पुनर्बांधणी करावी. विद्यार्थ्यांना सुरक्षित शालेय इमारत, स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि अन्य मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

**स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालाचे काय?**

मान्सूनपूर्वी २७ मुद्यांवर शाळांच्या इमारतींची तपासणी करण्याचे आदेश असताना बीड जिल्ह्यात या तपासणीचे नेमके काय झाले, किती शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आणि धोकादायक इमारतींबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली, याची माहिती जाहीर करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

**मुख्यमंत्र्यांसह शिक्षणमंत्र्यांना निवेदन**

जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदन पाठविण्यात आले. जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांच्या इमारतींची सुरक्षितता तपासून आवश्यक दुरुस्ती, पुनर्बांधणी आणि मूलभूत सुविधांसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

**आंदोलनात विविध संघटनांचा सहभाग**

आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड), सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक बीड), शेतकरी हक्क आंदोलक राजेंद्र आमटे,हनुमान घोडके, भीमराव कुटे, लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, सर्फराज पठाण, कृष्णा जगताप आदी सहभागी झाले.

cmyk

# झोपलेल्या आणि मोबाईलवर खेळणाऱ्या अधिकाऱ्यांना बडतर्फ करा

## रोहित पवारांचा संताप, दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्याला मदत देण्याची मागणी

लातूर / प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे सध्या मराठवाडा दौऱ्यावर आहेत. नुकसानीची पाहणी करत ते शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. दरम्यान, शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे रखडल्याच्या मुद्द्यावर आमदार रोहित पवार यांनी संताप व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान झालं असताना प्रशासनाकडून तातडीने पंचनामे आणि मदत मिळत नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. कर्तव्यावर असताना झोपणारे आणि मोबाईलवर खेळणारे अधिकारी असतील, तर अशा अधिकाऱ्यांना बडतर्फ केलं पाहिजे, अशी संतप्त भूमिका रोहित पवार यांनी मांडली.

शेतकऱ्यांच्या नुकसानीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळाली पाहिजे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील विविध गावात शेतकऱ्यांना भेटून शेतकऱ्यांशी चर्चा केली आणि त्यांच्या शेतातील जळालेल्या पिकांची पाहणी केली. धाराशिव आणि बीड जिल्ह्यापेक्षा इथंही काहीही वेगळी परिस्थिती नाही. शेतकरी हा प्रचंड संकटात आहे. कर्जमाफी अजून झालेली नाही आणि शेतात काही उरलं नाही असे रोहित पवार म्हणाले. दादा आम्ही आता जगायचं कसं?' हा शेतकऱ्यांचा प्रश्न काळीज चिरणारा आहे.



जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याला निसर्गाच्या प्रकोपामुळं कोलमडण्याआधीच आधार द्यावा लागणार आहे. शेतकऱ्यांचं दुःख ऐकूण घेताना सोबत असल्याचा धीर देण्याचं काम एक कार्यकर्ता म्हणून आम्ही करतोय. त्यामुळं सरकारने आपली जबाबदारी ओळखून अधिक वेळ न दवडता दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्याला तत्काळ मदत द्यावी असे रोहित पवार म्हणाले. दरम्यान, खरिपात ७५ टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे रब्बी हंगामाचीही आशा संपली असून, जनावरांच्या चाऱ्यासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुढील दहा महिने सर्वसामान्य शेतकऱ्यांना कसे जगवायचे, हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी केली आहे. रोहित पवार हे मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर आहेत.

धाराशिव आणि बीड जिल्ह्यांतील पाहणीनंतर ते लातूर जिल्ह्यातील किनगाव येथे दाखल झाले. यावेळी किनगावमधील शेतकऱ्यांनी रोहित पवार यांच्यासमोर आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. प्रशासनाकडून पंचनामे आणि मदत मिळत नसल्याबद्दल शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

# राज्यात चार लाख शेत आणि पाणंद रस्त्यांचे डिजिटल मॅपिंग सुरु



पुणेः राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीपर्यंत बारमाही, सुरक्षित आणि सुलभ दळणवळणाची सुविधा देण्यासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना सेतू : महापाणंद गतीशक्ती' अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. यातून सुमारे चार लाख शेत आणि पाणंद रस्त्यांचे डिजिटल मॅपिंग करून 'महापाणंद ग्रीड' उभारण्यात येणार आहे.

प्रकल्पाचा प्रस्ताव, अंदाजपत्रक, तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता, कार्यादेश, ई-मोजमाप पुस्तिका आणि ई-बिलिंगपर्यंतची प्रक्रिया या प्रणालीतून हाताळली जाणार आहे. त्यामुळे कामातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्याची अपेक्षा आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीमधून किमान दोन शेत किंवा पाणंद रस्त्यांची निवड केली जाणार आहे. गावातील नकाशावर नोंद असलेल्या आणि प्रत्यक्ष वापरात असलेल्या रस्त्यांची माहिती ग्रामस्थांच्या उपस्थितीत संकलित केली जाईल. राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत क्षेत्रीय स्तरावर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. भूमी अभिलेख विभागाकडून सीमांकन आणि आवश्यकतेनुसार अतिक्रमणमुक्तीची कार्यवाही केली जाणार आहे. त्यानंतर २३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान समितीच्या बैठका घेऊन पात्र रस्त्यांना मान्यता दिली जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांना या कामाचा आढावा घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# पिकांवरची फवारली मधमाशांसाठी ठरतेय 'स्लो पॉयझन'

रासायनिक खते व कीटकनाशकांचा शेतीमध्ये वाढत जाणाऱ्या वापरामुळे अनेक दुष्परिणाम होत आहेत. यामुळे जमिनीचा पोत खराब होणे, मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होत असताना आता यामुळे मधमाशांच्या प्रजाती वेगाने नष्ट होत आहेत. याचा परिणाम 'परागीकरणाच्या' प्रक्रियेवर होत असून, यामुळे भविष्यात उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.निसर्गात फुलांचे फळांत किंवा धान्यात रूपांतर होण्यासाठी एका फुलावरील परागकण दुसऱ्या फुलावर जाणे आवश्यक असते. ही महत्त्वपूर्ण प्रक्रिया मधमाशांमार्फत केली जाते. मानवी आहारातील जवळपास ७० ते ८० टक्के अन्नधान्य, भाज्या आणि फळांचे उत्पादन केवळ मधमाशांवर अवलंबून आहे. मात्र, अलीकडे कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे मधमाशांची संख्या घटली आहे. त्याचा परिणाम आता काही प्रमाणात का असेना शेतीच्या उत्पादनावर होत असल्याचे कृषी अभ्यासक व कीटक अभ्यासकांकडून सांगण्यात येत आहे.

मधमाशांना सुरक्षित अधिवास देण्याची गरज :शेताच्या बांधावर आणि मोकळ्या जागेत झेंडू, सूर्यफूल, मोहरी यांसारखी मधमाशांना आकर्षित करणारी फुलझाडे लावून त्यांना सुरक्षित अधिवास द्यावा. गरज असल्यासच जैविक कीटकनाशकांची फवारणी करावी आणि ती शक्यतो संध्याकाळी उशिरा करावी, जेणेकरून मधमाशा सुरक्षित राहतील.

कीटकनाशकांचा काय परिणाम होतो? : पिकांवर फवारली जाणारी रसायने मधमाशांसाठी 'स्लो पॉयझन' ठरत आहेत. या रसायनांमुळे मधमाशांच्या मज्जासंस्थेवर गंभी आघात होतो. त्यांची स्मरणशक्ती आणि दिश ओळखण्याची क्षमता नष्ट होते. मकरंद गोळा करण्यासाठी बाहेर पडलेली मधमाशी पुन्हा आपल्या पोळ्यापर्यंत पोहोचूच शकत नाही, अशी माहिती कृषी विज्ञान केंद्र व 'आत्मा'च्या तज्ज्ञांकडून देण्यात आली आहे.

काय म्हणतात अभ्यासक ? मधमाशांच्या कमी होत जाणाऱ्या परिणामांबाबत जिल्हा कृषी अधीक्षक तथा कीटकशास्त्र अभ्यासक कुर्बान तडवी यांनी सांगितले की, 'मधमाशा या शेतीचा खरा कणा आहेत. कीटकनाशकांच्या फवारणीमुळे केवळ शत्रू कीड मरत नाही, तर मधमाशांसारख्या अत्यंत उपयुक्त जिवांच्या संपूर्ण वसाहती नष्ट होत आहेत. मधमाशांचे प्रमाण कमी होत गेले तर, पुढच्या काही वर्षांत शेतीवर मोठे संकट निर्माण होऊ शकते. शेतकऱ्यांनी रासायनिक फवारणीला फाटा देऊन सेंद्रिय आणि जैविक कीटकनाशकांचाच वापर करणे गरज आहे.



# पावसाळी, हिवाळी आणि उन्हाळी तिन्ही ऋतूंमध्ये करता येणारी झेंडूची शेती

झेंडूची शेती हा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत कमी कालावधीत, कमी खर्चात आणि हमखास नफा मिळवून देणारा एक उत्कृष्ट व्यवसाय आहे. सण-उत्सव दसरा, दिवाळी, गणेशोत्सव, लग्नकार्ये आणि धार्मिक विधींमध्ये झेंडूच्या फुलांना वर्षभर प्रचंड मागणी असते. झेंडूच्या यशस्वी शेतीसाठी खालीलप्रमाणे शास्त्रोक्त नियोजन करणे गरजेचे आहे.

हवामान आणि जमीन :हवामान: झेंडूच्या पिकाला समशीतोष्ण हवामान चांगले मानवते. महाराष्ट्रात हे पीक पावसाळी, हिवाळी आणि उन्हाळी अशा तिन्ही ऋतूंमध्ये घेता येते. मात्र, कडक उन्हाळा किंवा अतिवृष्टीचा फुलांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. जमीन: मध्यम ते काळी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन या शेतीसाठी योग्य असते. सुपीक दोमट जमिनीत झेंडूचे उत्पादन उत्कृष्ट मिळते. जमिनीचा सामू (कि) ६.५ ते ७.५ च्या दरम्यान असावा.

सुधारित जाती :आफ्रिकन झेंडू : ही झाडे उंच वाढतात आणि फुले मोठी, चेंडूसारखी गोल असतात. बाजारात याला सर्वाधिक मागणी असते. प्रमुख जाती: मखमली, पुसा नारंगी, पुसा बसंती, कलकत्ता यलो. सध्या मार्केटमध्ये 'इन्का' (खपलर), 'इंडस', आणि 'टेनिस बॉल' या हायब्रिड (संकरित) जातींना खूप मागणी आहे. फ्रेंच झेंडू : ही झाडे आकाराने लहान आणि पसरट असतात. फुले लहान पण संख्येने जास्त असतात. प्रमुख जाती: पुसा अर्पिता, बटरस्कॉच. (यांचा वापर प्रामुख्याने कुंडीत किंवा सुशोभीकरणासाठी केला जातो).

रोपवाटिका आणि लागवड पद्धत :रोप तयार करणे:झेंडूची थेट बिया पेरण्यापेक्षा गादी वाफ्यावर रोपे तयार करून किंवा नामांकित नर्सरीतून 'टीशू कल्चर' / हायब्रिड रोपे आणून लागवड करणे फायदेशीर ठरते. बियाणे पेरल्यापासून साधारण २१ ते २५ दिवसांत रोपे लागवडीयोग्य होतात. लागवडीचे अंतर: लागवड करताना दोन ओळींतील अंतर ३ ते ४ फूट आणि दोन रोपांतील अंतर १ ते १.५ फूट ठेवावे. लागवड नेहमी सरी-वरंब्यावर किंवा गादीवाफ्यावर करावी. मल्चिंग पेपरचा वापर: आधुनिक पद्धतीत गादीवाफ्यावर मल्चिंग पेपर (२५खा) आणि ठिबक सिंचन वापरल्यास तणांचा प्रादुर्भाव होत नाही आणि पाण्याचा योग्य वापर होतो.



पाणी आणि खत व्यवस्थापन :पाणी व्यवस्थापन: पावसाळ्यात गरजेनुसार, हिवाळ्यात ८ ते १० दिवसांनी आणि उन्हाळ्यात ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. फुलांच्या वाढीच्या काळात पाण्याचा ताण पडू देऊ नये. खत व्यवस्थापन: लागवडीपूर्वी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. रासायनिक खतांमध्ये नत्र, स्फुरद आणि पालाश योग्य प्रमाणात द्यावे. झाडाची शाकीय वाढ आणि फुलांची संख्या वाढवण्यासाठी लागवडीनंतर सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी.

शेंडे खुडणे : लागवडीनंतर साधारण २५ ते ३० दिवसांनी झाडांचा मुख्य शेंडा वरून थोडा खुडून (कट करून) टाकावा. फायदा: मुख्य शेंडा खुडल्यामुळे झाडाला बाजूने अनेक नवीन फुटवे (फांद्या) फुटतात. झाड डेरेदार होते आणि फुलांची संख्या दुप्पट-तिप्पट वाढते.

रोग व कीड नियंत्रण :कीड: फुलकिडे आणि तांबडी कोळी हे पानांतील रस शोषून घेतात, ज्यामुळे पाने आकसतात. यासाठी निंबोळी अर्क किंवा शिफारस केलेल्या कीटकनाशकांची फवारणी करावी. रोग: भुरी आणि करपा या रोगांमुळे पानांवर पांढरे किंवा काळे डाग पडतात. याच्या नियंत्रणासाठी बुरशीनाशकांची (र्त्रीपसळलळवशी) फवारणी करावी.काढणी आणि उत्पादन :लागवडीनंतर साधारण २ ते २.५ महिन्यांत (६० ते ७० दिवस) फुले काढणीस तयार होतात. फुले पूर्ण उमलल्यावर, सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळी देठासह तोडावीत. एकरी साधारण ५ ते ८ टनांपर्यंत फुलांचे उत्पादन मिळू शकते (जातीनुसार आणि योग्य व्यवस्थापनानुसार).

खर्च आणि नफा गणित :खर्च: एकरी रोपे, खते, मल्चिंग, मजुरी असा साधारण ४०,००० ते ५०,००० रुपये खर्च येतो. नफा: सरासरी भाव ३० ते ५० रुपये प्रति किलो मिळाला, तरी १.५ ते २.५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. जर दसरा-दिवाळीच्या मुहूर्तावर बाजारात फुले आली आणि भाव १०० ते १५० रुपये किलोवर गेला, तर नफा दुप्पट होऊ शकतो. झेंडूच्या शेतीचे नियोजन करताना सण-उत्सव आणि लग्नाचे मुहूर्त लक्षात घेऊन पाऊण ते दोन महिने आधी लागवड करावी, जेणेकरून नेमक्या ऐन तेजीच्या काळात तुमचे उत्पादन बाजारात येईल आणि तुम्हाला बंपर भाव मिळेल.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५९८ : फ्रांस चे शासक हेनरी चतुर्थ (क्शपी खत) यांनी इसाई धर्माचा नांत चा प्रख्यात आदेश जारी केला.
१७८४ : रेगुलेटिंग क्टच्या दुर्बलतेवर मात करण्यासाठी आणि ब्रिटिशांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ब्रिटीश संसदेने पिट्स इंडिया क्ट पास केला.
१८९८ : हॅनीबल गुडविन यांनी सेल्यूलॉइड फोटोग्राफिक फिल्म चे पेटंट घेतले.
१९१३ : साली ब्रिटीश धातुशास्त्रज्ञ हॅरी ब्रेअर्ली यांनी स्टेनलेस स्टीलचा आविष्कार केला.
१९२२ : लीबीयातील अझिजीया येथे ५७.२ओ सेल्सिअस ही जगातील आजवरच्या सर्वाधिक तापमानाची नोंद झाली.
१९४८ : ऑपरेशन पोलो - विलीनीकरणासाठी भारतीय सैन्याने हैदराबादवर चढाई केली.
१९८५ : सुपर मारियो गेम जपान मध्ये प्रकाशित झाला.
१९८९ : आर्चबिशप डेसमंड टुटू यांनी वर्णद्वेषी धोरणाला विरोध करण्यासाठी दक्षिण अफ्रिकेत विशाल मोर्चा काढला.
१९९६ : महिला आणि बालकल्याणासाठी लक्षणीय कामगिरी बजावणार्या महिलेला देण्यात येणारा 'श्रीमती जानकीदेवी बजाज पुरस्कार' ज्येष्ठ समाजसेविका आणि स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्त्या श्रीमती इंदुमती पारिख यांना देण्यात आला.
२००० : चीनच्या शेनयांग येथे १ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २००० दरम्यान खेळण्यात आलेली २४-खेळाडूंची श्रेणी दतख ची बुद्धिबळ स्पर्धा म्हणजेच फिड वर्ल्ड कप विश्वनाथ आनंद यांनी जिंकला
२००३ : मेंडोलिन वादक यू. श्रीनिवास यांना राष्ट्रीय कुमार गंधर्व पुरस्कार जाहीर.
२००३ : ज्येष्ठ गायक पं. दिनकर कैकिणी यांना तानसेन यांना राष्ट्रीय कुमार गंधर्व पुरस्कार जाहीर.
२००८ : दिल्ली येथे झालेल्या बॉम्बस्फोटांच्या मालिकेत ३० जण ठार तर सुमारे १३० जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४५ : साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ब्रिटीश अध्यक्ष हेनरी कॉटन (क्शपी उेींप) यांचा जन्मदिन.
१८५२ : गणेश जनार्दन आगाशे - नामांकित शिक्षक, संस्कृत पंडित, व्युत्पन्न ग्रंथकार, उत्तम वक्ते व इंदूर येथे भरलेल्या १० व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (मृत्यू: )
१८५७ : मिल्टन हर्शे - 'द हर्शे चॉकलेट कंपनी'चे संस्थापक (मृत्यू: १३ आक्टोबर १९४५)
१८६५ : भारतीय-इंग्रजी फील्ड मार्शल विल्यम बर्डवुड यांचा जन्म. (मृत्यू: १७ मे १९५१)
१८८६ : सर रॉबर्ट रॉबिनसन - वनस्पतिज रंग व अल्कलॉईड्सवर संशोधन करणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९७५)
१८९० : मोनाको ग्रांप्री चे संस्थापक अँटोनी नोगेस यांचा जन्म. (मृत्यू: २ ऑगस्ट १९७८)
१९३२ : डॉ. प्रभा अत्रे - शास्त्रीय गायिका
१९३९ : साली प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी व निबंधकार भागवत रावत यांचा जन्मदिन.
१९४६ : साली परमवीर चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय सैन्य दलाचे अधिकारी मेजर रामास्वामी परमेश्वरन यांचा जन्मदिन.
१९६७ : मायकेल जॉन्सन - अमेरिकन धावपटू
१९६९ : शेन वॉर्न - ऑस्ट्रेलियन लेगस्पिनर
१९७१ : गोरान इव्हानिसेव्हिच - क्रोएशियाचा लॉन टेनिसखेळाडू
१९७६ : क्रेग मॅकमिलन - न्यूझीलंडचा अष्टपैलू क्रिकेटपटू
१९८० : भारतीय हॉकी खेळाडू वीरेन रास्किन्हा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९३ : मामा परमानंद - पत्रकार व विचारवंत, प्रार्थना समाजाचे एक संस्थापक (जन्म: ३ जुलै १८३८)
८१ : टायटस - रोमन सम्राट (जन्म: ३० डिसेंबर ३९)
१९२६ : श्रीधर पाठक - हिन्दी कवी, लखनौ येथे भरलेल्या पाचव्या हिन्दी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (जन्म: ११ जानेवारी १८५८)
१९२८ : सुप्रसिद्ध हिंदी कवी श्रीधर पाठक यांचे निधन. (जन्म: ११ जानेवारी १८५८)
१९२९ : लाहोर कटातील क्रांतिकारक जतिन दास यांनी तुरुंगातील जुलुमाचा निषेध म्हणून केलेल्या उपोषणात त्यांचा ६३ व्या दिवशी मृत्यू झाला. (जन्म: २७ आक्टोबर १९०४)
१९७१ : केशवराव त्र्यंबक दाते - चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते, नाट्यशिक्षक. महाराष्ट्र नाटक मंडळी या संस्थेच्या नाटकांमधून त्यांनी काही स्त्री नायिकांच्या भूमिका केल्या. (जन्म: २४ सप्टेंबर १८८९ - अडिवरे, रत्नागिरी, महाराष्ट्र)
१९७३ : भारतीय कवी आणि तत्त्ववेक्षक सज्जाद झहिर यांचे निधन. (जन्म: ५ नोव्हेंबर १९०५)
१९७५ : भारतीय गायक आणि संगीतज्ञ मुदिकॉन्दाम वेंकटरम अय्यर यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १८९७)
१९९५ : डॉ. महेश्वर नियोग - प्रख्यात आसामी साहित्यिक आणि इतिहासकार, पद्मश्री (१९७४), आसाम साहित्य परिषदेचे अध्यक्ष (जन्म: ७ सप्टेंबर १९१५ - कमरफादिया, शिवसागर, आसाम)
१९९७ : लालजी पाण्डेय तथा 'अंजान' - हिन्दी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार (जन्म: २८ आक्टोबर १९३०)
२००४ : गर्भनिरोधक गोळी चे संशोधक लुइस ई. मिरमोंटेस यांचे निधन. (जन्म: १६ मार्च १९२५)
२०१२ : रंगनाथ मिश्रा - भारताचे २१ वे सरन्यायाधीश (जन्म: २५ नोव्हेंबर १९२६)

# पक्षशिस्त आणि संघटन बळकटीसाठी एकजुटीने काम करा - रावसाहेब दानवे

## प्रत्येक बूथ सक्षम करा, सेवा संकल्प अभियान यशस्वी करा-भास्कर दानवे

जालना। प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक आज दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी कलश सीड्स, जालना येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. यावेळी भाजप नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे, आ. सुहास शिरसाठ, कैलास गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीच्या प्रारंभी दीपप्रज्वलन, पूर्ण वंदे मातरम्, महाराष्ट्र गीत व बैठक गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर बैठकीत विविध संघटनात्मक व सामाजिक विषयांवर सविस्तर चर्चा करून आगामी काळातील कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना भाजप नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना पक्षशिस्तीचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले की, पक्षासाठी काम करताना पद, संख्या किंवा वैयक्तिक मतभेद यापेक्षा पक्षाची शिस्त आणि संघटनात्मक बांधिलकी अधिक महत्त्वाची आहे. आपापसातील मतभेद बाजूला ठेवून पक्षहिताला प्राधान्य देत सर्वांनी एकजुटीने काम केले पाहिजे. प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने आपली जबाबदारी ओळखून केवळ पदापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जनतेमध्ये जाऊन काम करावे. बूथपासून महानगरापर्यंत संघटना अधिक सक्षम करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असून, पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. संघटनेत काम करताना व्यक्तिगत मतभेद किंवा नाराजीला स्थान न देता पक्षाच्या ध्येय-धोरणांना केंद्रस्थानी ठेवून काम केल्यास संघटना अधिक मजबूत होईल, असे दानवे यांनी स्पष्ट केले.

माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली केंद्र




व राज्य शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर दिला. ते म्हणाले की, सरकारच्या योजनाचा प्रत्यक्ष लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केवळ राजकीय कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता सातत्याने जनतेच्या संपर्कात राहावे, त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि शासनाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी. केंद्र व राज्य सरकारच्या विकासकामांची आणि जनहिताच्या निर्णयांची माहिती प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी स्वीकारावी. जनतेशी सातत्याने संवाद ठेवून सरकारचे काम लोकांपर्यंत पोहोचवावे तसेच नागरिकांच्या प्रश्नांवर प्रशासनाकडे पाठपुरावा करावा, असे ही लोणीकर यांनी सांगितले.आ.नारायणजी कुचे यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय ठराव मांडण्यात आला. पक्षाच्या संघटनात्मक वाटचालीसह आगामी कार्यक्रमांमध्ये पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभावी सहभाग नोंदवावा, यावर बैठकीत भर देण्यात आला.माजी आमदार कैलासजी गोरंटयाल यांनी ड.ख.ठ. संदर्भातील आढावा व पुढील नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. संबंधित कामकाजात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासोबतच आगामी काळातील विविध संघटनात्मक व सामाजिक उपक्रमांचे नियोजन प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले. बूथस्तरापासून महानगरापर्यंत संघटना अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने आपल्या जबाबदारीच्या क्षेत्रात नियमित संपर्क ठेवून सक्रियपणे काम करणे आवश्यक आहे, यावेळी त्यांनी 'सेवा संकल्प अभियान प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन करत सांगितले की, देशाचे आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या जनसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जालना महानगरातील प्रत्येक मंडल, प्रभाग, बूथ आणि घरापर्यंत हे अभियान पोहोचविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. अभियानात नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविणे, जनतेशी संवाद साधणे आणि सेवा व विकासाचा संदेश घराघरापर्यंत पोहोचविणे यावर भर देण्यात यावा, असे हि त्यांनी सांगितले. यावेळी सर्व नगरसेवक, भाजपा जालना महानगर जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य, मंडल पदाधिकारी, विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप भाजप नेते रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाने झाला, तर आभार प्रदर्शन महेश निकम यांनी केले.

# अहमदपूर पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड

## ११.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त. तिर्रट जुगार खेळताना चौघांना ताब्यात; तीन जण फरार

अहमदपूर। प्रतिनिधी

पोलीस ठाण्याच्या पथकाने थोडगा परिसरात सुरू असलेल्या तिर्रट जुगाराविरुद्ध प्रभावी कारवाई करत रोख रक्कम, जुगाराचे साहित्य, मोबाईल फोन, पत्ते व वाहने असा एकूण ११ लाख ७५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत चार जण पोलिसांच्या ताब्यात आले असून, तीन जण घटनास्थळावरून फरार झाले आहेत.दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे सुमारे १ वाजता थोडगा गावाच्या शिवारात शंकर मुंडे यांच्या शेतातील लिंबाच्या झाडाखाली काही व्यक्ती पैसे घेऊन तिर्रट नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी कारवाई केली.

या कारवाईदरम्यान १)शिवराज व्यंकट दहिफळे (वय ४०, रा. कोळवाडी, ता. अहमदपूर, ह.मु. सोनपेठ, जि. परभणी).२)विनोद परशुराम राठोड (वय २८, रा. मरशिवणी तांडा, ता. अहमदपूर)३) राजकुमार अण्णाराव मजगे (वय ६५, रा. वायगाव, ह.मु. अहमदपूर) ४)महेश संजय करले (वय २८, रा. थोडगा, ता. अहमदपूर) यांना ताब्यात घेण्यात आले. तर ५) अंकुश राठोड ६) राजू मुंडे ७) अर्जुन गुंडे हे घटनास्थळावरून फरार झाले.कारवाईमध्ये रोख रक्कम, तिर्रट जुगाराचे साहित्य, मोबाईल फोन, पत्ते तसेच वाहने असा एकूण ११,७५,५००/- किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.सदर प्रकरणी पोलीस ठाणे अहमदपूर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६३०/२०२६, कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस ठाणे अहमदपूरचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. मेत्रेवार यांच्या आदेशाने करण्यात आली. फिर्यादी म्हणून पोलीस अंमलदार विशाल राजेंद्र सारोळे यांनी तक्रार दिली असून, गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अंमलदार आरदवाड करीत आहेत.पोलिसांनी फरार आरोपींचा शोध सुरू केला असून, जुगाराच्या माध्यमातून अवैध आर्थिक व्यवहार करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

**जाहिरनामा**

**मा. श्रीमती एस. डी. सोनी २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१५०९/२०२६**
**आशाबाई काशिनाथ बांडे विरुद्ध निरंक**
**विधीज्ञ : काचमांडे यु.ए.**
**मागणी: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः १. आशाबाई भ्र. काशिनाथ बांडे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. आंबेसावळी, ता.जि. बीड. २. गोपीनाथ पि. काशिनाथ बांडे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा.आंबेसावळी, ता.जि. बीड. ३. मंदा भ्र.बाळू धुमाळ, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. काळेगांव हवेली, ता.जि. बीड. ४. राधा भ्र. आबासाहेब नांदे, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा.दत्त मंदिर जवळ, खेड, ता. खेड, जि.पुणे.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे काशिनाथ साहेबराव बांडे यांचा मृत्यु दिनांक ०२/०८/२०२१ रोजी मौजे आंबेसावळी, जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार नं. २ हा मयताचा मुलगा आहे अर्जदार क्र.३ व ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई-वडील हे फार पूर्वीच मयत झालेले आहे अर्जदारांशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.मयत नामे काशिनाथ साहेबराव बांडे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्य येते की, सदरह अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्या तारखेपासून एक महिन्याने आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हया हक्काबद्दल लागलीन पुरावा घेवुन, त्यांना हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत नामे काशिनाथ साहेराव बांडे याने वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल यानी नोंद घ्यावी.

मदर प्रकरणात पुढील तारीख १९.१०.२०२६ आहे. आज दिनांक ११.०९.२०२६ रोजी माहो महीने व न्यायालयाने शिक्क्याने दिले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत** | **आदेशावरून** |
| **क. लिपीक** | **स्वाक्षरीत** |
| **२ रे मह दिवाणी न्यायालय** | **अधिक्षक** |
| **व स्तर बीड** | **दिवाणी न्यायालय, व. ग्तर, बीड** |

# ऊसतोडणी मजूर मुकादम आणि वाहतूकदाररांचा संपाचा एल्गार?

## तीन वर्षाचा करार संपला नवीन करार होत नाही तोपर्यंत कारखान्याची चाक फिरू देणार नाही-संजय कीर्तने

पाथर्डी । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील प्रामुख्याने मराठवाड्यातील बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील संघटित असलेला ऊसतोड मजूर मुकादम आणि वाहतूकदार आपल्या परिश्रमाने महाराष्ट्रातील साखर उद्योगाला नवसंजीवनी देत आहे.

ऊसतोड मजूर वाहतूकदार मुकादम कामगार यांचे नेतृत्व लोकनेते गोपीनाथ मुंडे करत होते त्यांच्या पश्चात मंत्री पंकजा मुंडे या साखर संघ व लवादावर प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत दसरा व दिवाळीपूर्वी महाराष्ट्रातील साखर कारखाने सुरू होणार असल्याने नव्याने ऊसतोड मजूर वाहतूकदार मुकादम यांचा नव्याने करार करण्याची मागणी ऊसतोड मजूर संघटना करू लागले आहेत.



यामध्ये ऊसतोड मजुरांची मजुरी १०० टक्के दरवाढ करावी बैलगाडी ट्रॅक्टर ट्रक वाहतुकीमध्ये १०० टक्के वाढ करावी मुकादम यांच्या कमिशनमध्ये ५० टक्के वाढ करावी ऊसतोड मजूर वाहतूकदार मुकदम यांचा जीवन विमा कारखान्याकडे बंधनकारक करावा कारखाना साइटवर ऊसतोड मजूर वाहतूकदार मुकदामाचा अपघाती मृत्यू झालास सरकार व कारखाना यांनी मिळून संयुक्त २५ लाख रुपये मदत करावी कारखाना कार्यस्थळावर शाळा रुग्णवाहिका दवाखाना महिलांसाठी शौचालय पशुधन दवाखाने इत्यादी सोई सुविधा निर्माण कराव्यात तसेच लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड मजूर महामंडळास ५०० कोटी रुपये निधी देऊन ऊसतोड मजुरांच्या विद्यार्थ्यांचा शालेय व उच्च शिक्षणाचा खर्च महामंडळमार्फत करण्यात यावा अशा मागण्या साखर संघ लवाद व सरकार यांनी पूर्ण करण्याची मागणी ऊसतोड मजूर संघटना करत आहेत यासाठी त्रिसदस्य समिती गठित करून गळीत हंगाम सुरू करण्यापूर्वी सकारात्मक तोडगा काढण्याची मागणी करण्यात येत आहे.

# कानेगावामध्ये ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह, २७ सप्टेंबरला काल्याच्या कीर्तनाने सांगता

लोहारा। प्रतिनिधी

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथे संत शिरोमणी मारुती महाराज कानेगावकर यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त रविवारी (दि. २०) नगरप्रदक्षिणा व पालखी सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडला.कानेगाव येथे संत शिरोमणी मारुती महाराज यांचे समाधीस्थळ असून आषाढी एकादशी व पुण्यतिथीनिमित्त हजारो भाविक दर्शनासाठी येतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही पुण्यतिथीनिमित्त यात्रा व सलग सात दिवसांच्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी पालखी मिरवणुकीस मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. यावेळी सरपंच नामदेव लोभे, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील सुखराज कदम यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

पालखी सोहळ्यात गावातील महिला डोक्यावर कलश घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. धनगरी ढोल, वारूवाले, बँजो, वारकरी, लेझीम पथक आणि पंचक्रोशीतील भाविक व ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

# बाबूजी आव्हाड महाविद्यालयात हिंदी सप्ताहचे आयोजन



पाथर्डी। प्रतिनिधी

जीवन म्हणजे केवळ एक श्वास नसून तो एक अनुभव विचार आणि सृजनशीलतेचा प्रवास आहे. कविता मग ती कोणत्याही भाषेतील असो कवितांनी नेहमीच जीवनाचे विविध रंग उलगडले आहेत कविता मानवी संवेदना प्रकट करण्याचे काम करते कविता आपल्या जीवनातील साधेपणा सुंदरता आणि संघर्ष याची खरी ओळख करून देते असे प्रतिपादन जेष्ठ कवी चंद्रकांत कर्डक यांनी केले ते बाबुजी आव्हाड महाविद्यालयात हिंदी सप्ताह समारोप तसेच साहित्य मंडळ उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी प्राचार्य डॉ.बबन चौरे पर्यवेक्षक प्रा.सलीम शेख डॉ.अशोक डोळस डॉ.वैशाली आहेर डॉ.आशा पालवे प्रा.अरुण नेहूल उपस्थित होते कवी चंद्रकांत कर्डक म्हणाले भारताला एकात्मकता प्रदान करण्याचे व एकसंघ ठेवण्याचे काम हिंदी भाषा करते प्राचीन संस्कृत भाषेची वंशज म्हणून समजली जाणारी हिंदी भाषा समजण्यास सोपी असून राष्ट्राची संपर्कभाषा म्हणून ओळखली जाते सुमारे एक हजार वर्ष जुनी असणाऱ्या हिंदी इतकी साहित्याच्या दृष्टीने समृद्ध भाषा जगात दुसरी कोणतीही नाही कर्डक यांनी यावेळी सामाजिक प्रेमविषयक महागाई दुष्काळ जाती धर्म लॉकडाऊन तसेच विविध हिंदी विडंबन गीत सादर केले आदिती इजारे या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले यावेळी हिंदी निबंध लेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कनिष्ठ महाविद्यालयातून आदिती इजारे हिने प्रथम प्रतीक्षा विभूते हिने द्वितीय तर सिद्धी पालवे व सिद्धार्थ शेळके यांनी तृतीय क्रमांक मिळविला वरिष्ठ महाविद्यालयातून पूजा गवांदे हिने प्रथम अक्षदा सानप हिने द्वितीय तर वैष्णवी नेटके हिने तृतीय क्रमांक मिळविला पोस्टर स्पर्धेत श्रुती गरड हिने प्रथम नम्रता काळे हिने द्वितीय तर अलोक बंग व तनुजा रोडे यांनी तृतीय क्रमांक मिळविला कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.सलीम शेख तर आभार डॉ.अशोक डोळस यांनी मानले.

# स्व.सुवालालजी वाकेकर सामाजिक प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेच्या पुरस्कारांचे थाटात वितरण

## ज्या समाजात साहित्यक, उद्योजक व शिक्षकांचा सन्मान होतो.तो समाज खऱ्या अर्थाने संवेदनशील समाज राहतो -आयुक्त दिर्पा मुधोळ-मुंडे

परळी । प्रतिनिधी

स्व.समाजभूषण सुवालालजी वाकेकर सामाजिक प्रतिष्ठान आणि मराठवाडा साहित्य परिषद, परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'साहित्य सेवागौरव,उद्योगरत्न व आदर्श शिक्षक पुरस्कार' सोहळा रविवार,दि. २० सप्टेंबर रोजी वैद्यनाथ कॉलेजच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाला.यावेळी सभागृहास संबोधित करताना समाजकल्याण आयुक्त दिपाताई मुधोळ-मुंडे बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष विजयसेठ वाकेकर होते.पुणे येथील समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ - मुंडे यांच्या शुभहस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष पी. एस. घाडगे गुरुजी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी तौरल इंडिया प्रा. लि.चे संचालक भारत केशवराव गित्ते यांना 'उद्योगरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक शंकर जयवंतराव




मामीलवाड यांचाही शैक्षणिक सेवेसाठी सेवागौरव करण्यात आला.

केज येथील साने गुरुजी निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.कविता गित्ते यांना शासनाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' देऊन विविध शिक्षकांचा गौरव करण्यात आला.पुरस्कारार्थींमध्ये अंजली रेणुका वसंतराव कुलकर्णी,शशिकला नरसोबा फुंदे,मनीषा गुलाबराव सरवदे, प्रियतमा विष्णू कराड, प्राजक्ता चंद्रशेखर खानापुरे, संदिपान रामभाऊ फड, श्रीकांत जनार्दन बोबडे,हरी बाबुराव केंद्रे,मिलिंद राणोजी साळवे,निवृत्ती नामदेव येवले आणि सय्यद आमेर सय्यद जमील यांचा समावेश होता.कार्यक्रमास साहित्यिक, शिक्षक,सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणप्रेमी व नागरिकांची उपस्थिती होती.साहित्य, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करून त्यांच्या कार्याची दखल घेण्याचे काम या पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून करण्यात आले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.रोजगारनिर्मिती करणे हे आमच्या उद्योगाचे ध्येय आहे.समाज व राष्ट्र स्वावलंबी बनण्यात उद्योगाचा महत्त्वपूर्ण वाटा असतो.त्यात मी माझ्या पद्धतीने माझी भूमिका पार पाडतो आहे.मला उद्योगरत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले.हे माझे भाग्य.कारण मातीतला पुरस्कार हा दुसऱ्या कितीतरी मोठ्या पुरस्कारापेक्षा मोठा असतो ही भावना यावेळी ल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळख असलेले भरत गीते यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली.तर 'ज्या समाजात साहित्यिकाचा ,उद्योजकांचा , व शिक्षकांचा सन्मान होतो.

तो समाज खऱ्या अर्थाने संवेदनशील समाज राहतो.असे मत समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ मुंडे मॅडम यांनी मांडले.शिक्षकाने राष्ट्राच्या उभारणीमध्ये आतापर्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे अगदी तशीच भूमिका यापुढेही पार पाडावी असेही त्यांनी यावेळी आपले मत मांडले.मराठवाडा साहित्य परिषद ही एक गतिमान शाखा आहे असे गौरवोद्गार यावेळी प्रमुख पाहुणे पी.एस.घाडगे गुरुजी यांनी काढले.अध्यक्षीय समारोपात समाजभूषण स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या विचाराचा वारसा पुढे चालवत मराठवाडा साहित्य परिषदेच्या माध्यमातून विविध उपक्रम आम्ही सातत्याने घेत राहू अशी भूमिका विजयशेठ वाकेकर यांनी मांडली.सत्काराला उत्तर म्हणून सौ.अंजली कुलकर्णी व डॉ कविता गित्ते यांचीही यावेळी मनोगते संपन्न झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड यांनी तर सूत्रसंचालन कवी अनंत मुंडे व आभार प्रकटन बंडू अघाव यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठवाडा साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष प्राचार्य अरुण पवार ,दिवाकर जोशी ,प्राचार्य रमेश राठोड,सिद्धेश्वर इंगोले,बालाजी कांबळे, डॉ.राजाभाऊ धायगुडे ,महेश होनमाने ,दीपकशेठ वाकेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दुष्काळ जाहीर करून पन्नास हजार हेक्टरी द्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शेकापचा बैलगाडी मोर्चा

केज । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना शासनाने तातडीने ठोस मदत जाहीर करावी, शेतकऱ्याला प्रत्येक ठिकाणी मिळवलं जातंय अशा परिस्थितीमध्ये विज बिल माफ करणं गरजेचं आहे पिक विमा मागच्या वर्षीचा देखील देण्यात यावा, शासन दरबारी तात्काळ मागण्याचा विचार झाला नाही तर झाल्यास चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा शेकाचे राज्य चिटणीस मंडळ चे सदस्य भाई मोहन गुंड यांनी प्रशासनाला बोलताना दिला, या जिल्हा चिटणीस ॲड नारायण गोले, बापुसाहेब सुळुके यांनी बोलताना सरकारवर





कडाडून टीका केली, यावेळी हनुमंत भोसले, राहुल खोडसे, राष्टपाल पाटुळे, अक्षय भुंबे या वेळी शेकापचे भाई अशोक रोडे ॲड निखिल बचुटे हभप अशोक महाराज, मंगेश देशमुख, महेश गायकवाड बालु भासले, दिगंबर मगर,धनराज भासले अनिल नखाते विनोद आगलावे, किशोर सुरवसे, मुस्तक शेख, गोविंद गुंड, दादा हास्वले बाबुराव जाधव दिगाबर गुंड यांनी मोर्चा यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

**शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, शासनाने आता केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष निर्णय घेऊन मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, अशी भूमिका मोर्चेकऱ्यांनी मांडली अन्यथा शेतकऱ्याच्या रोशाला आणि आंदोलनाला सरकारला सामोरे जावे लागेल असं इशारा भाई मोहन गुंड यांनी दिला.**

मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आंबेडकर चौक येथून वाजत गाजत शासन विरोधी घोषणा देत सोमवारी (दि. २१) केज तहसील कार्यालयावर भव्य बैलगाडी मोर्चा काढण्यात आला. भाई मोहन गुंड यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या या मोर्चात परिसरातील शेतकरी बैलगाड्यांसह मोठ्या संख्येने सहभागी झाले.

पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून, उत्पादन खर्चही भरून निघण्याची परिस्थिती नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. त्यातच सन २०२५ मधील खरीप व रब्बी हंगामाचा पीकविमा अद्याप प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. शासनाकडून घोषणा होत असल्या तरी प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर कधी पोहोचणार, असा सवाल मोर्चेकऱ्यांनी उपस्थित केला.

मोर्चादरम्यान करपलेल्या पिकांची होळी करून शासनाच्या शेतकरी धोरणांविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. शेतकऱ्यांना दुष्काळी मदत, पीकविमा, पुरेसा वीजपुरवठा आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यात प्रशासनाने विलंब करू नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

मोर्चानंतर तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस ॲड. नारायण गोले , भाई बापूसाहेब सोळुंके यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.१. बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर पान ३ वर

# अमली पदार्थांच्या विळख्यातून बीडला मुक्त करणार, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा कठोर पवित्रा!

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वाढत्या वापराला आळा घालण्यासाठी आणि क्षेत्रीय स्तरावरील ही समस्या समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अमली पदार्थ प्रतिबंधात्मक समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय यंत्रणेला अमली पदार्थांच्या विरोधात १०० टक्के कडक कारवाया करण्याचे आदेश दिले असून, व्यसनमुक्तीसाठी संबंधित




**शाळा आणि महाविद्यालयीन परिसरामध्ये अमली पदार्थांच्या विरोधात १०० टक्के कडक कारवाया करण्याचे यंत्रणेला स्पष्ट निर्देश**

यंत्रणेने आता पूर्णपणे 'ॲक्शन मोड'वर येणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.

बैठकीच्या सुरुवातीला बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी 'कोटपा' कायद्यांतर्गत जिल्ह्यात जास्तीत जास्त कारवाया करून अमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्याच्या सूचना दिल्या. विशेषतः माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले. मुख्याध्यापक आणि शिक्षणाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची शासन निर्णयाचा संदर्भ देत जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, १० जुलै २०२३ च्या आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी आणि मुख्याध्यापकांना अमली पदार्थ तसेच तंबाखू विरोधी कारवाया करण्याचे अधिकार व सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता केवळ प्रशासनावर भिस्त न ठेवता, मुख्याध्यापकांनीदेखील या पान ३ वर

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पेठ बीड पोलिसांचे पथसंचलन

## देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांचा बंदोबस्त; शांतता व कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

गणेशोत्सवानिमित्त बीड शहरातील विविध भागांत आकर्षक देखावे उभारण्यात आले आहेत. हे देखावे पाहण्यासाठी शहरासह परिसरातील महिला, युवक, युवती आणि लहान मुले मोठ्या संख्येने येत आहेत. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पेठ बीड पोलिसांनी सोमवारी, २१ सप्टेंबर रोजी पथसंचलन केले.

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रमुख रस्ते आणि गर्दीच्या परिसरातून हे पथसंचलन करण्यात आले. गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवणे, महिलांची व मुलांची सुरक्षितता सुनिश्चित करणे तसेच अनुचित प्रकारांना आळा घालणे, यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. पान ३ वर



# समीर काझी यांची बदनामी केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा

## बशीरगंज चौकातील प्रतिकात्मक पुतळा दहन प्रकरण,पोलिसांकडून तपास सुरू

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे माजी अध्यक्ष समीर गुलामनबी काझी यांची बदनामी करण्याच्या उद्देशाने बशीरगंज चौक, बीड येथे त्यांच्या नावाचा प्रतिकात्मक पुतळा तयार करून दहन केल्याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे शहरातील राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी बशीरगंज चौक परिसरात समीर काझी यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान त्यांच्या नावाचा प्रतिकात्मक पुतळा तयार करून तो सार्वजनिक ठिकाणी दहन करण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेचे व्हिडिओ व छायाचित्रेही प्रसारित झाल्याने प्रकरणाची चर्चा अधिक वाढली. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनेची दखल घेतली. त्यानंतर संबंधित तक्रारीवरून बीड शहर पोलीस ठाण्यात इनाम कादरी, इमरान खान मोहब्बत खान, अरबाज खान बाबर खान, अफरोज खान शेर खान आणि शेख कैफ यांच्यासह इतर काही व्यक्तींविरुद्ध संबंधित कायदेशीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. या आंदोलनामागील नेमकी पार्श्वभूमी काय होती, आंदोलनाचे आयोजन कोणी केले, त्यामध्ये कोण कोण सहभागी होते, तसेच सार्वजनिक ठिकाणी आंदोलन व प्रतिकात्मक पुतळा दहन करण्यासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का, याबाबत पोलीस तपास करीत आहेत. पोलिसांकडून आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता का, सार्वजनिक शांततेवर त्याचा परिणाम झाला का, तसेच घटनेतील प्रत्येक व्यक्तीची भूमिका काय होती, याचीही माहिती घेतली जात असल्याचे समजते.

# सौ चुहे खाकर काझी हज की बात ना करे – जेडी शाह, एजाज

**बीड । प्रतिनिधी**

शंभर उंदीर खाऊन हज करण्यात कसला अर्थ नसतो त्या प्रमाणे २७६ एक्कर मालमत्ता धन दांडग्यांच्या आणि लांडग्यांच्या घशात घालणारे समीर काझी आता पत्रकार परिषद घेऊन पवित्रपणाचा आव आणत आहेत .असे सामाजिक कार्यकर्ते जेडी शहा व एजाज मेम्बर यांनी म्हटले आहे.

इस्लाम धर्माच्या पवित्र स्थळाच्या जमीन मालमत्ता बनावट दस्त बनवून समीर काझी यांच्या कारकिर्दीत नेत्यांना भू माफियांना देण्यात आल्या आहेत . आपल्याला मिळालेली संधी खिदमत साठी नाही तर मूळ स्वभावानुसार व्यापार करायला साधली गेली . व्यापाऱ्याने व्यापारच करावा मात्र अल्लाहच्या जमिनीचा करू नये . आपली लढाई पुन्हा पद रुबाब मिळवण्यासाठी नाही तर इस्लामच्या तत्वानुसार न वागणाऱ्या आणि अल्लाहच्या जमिनी लाटणाऱ्या विरोधात आहे . समीर काझी यांनी अल्लाहची माफी मागावी देवस्थानाच्या जमिनी परत मिळाव्यात ही आमची मागणी आहे .आजची पत्रकार परिषद म्हणजे पाप करून पुण्याच्या गोष्टी आहेत आम्ही हा लढा गल्ली ते दिल्ली नेणार असून दोषी कुठल्याही बिळात लपला तरी त्याला शोधून काढू . एका कारकिर्दीत उन्हाळा करणाऱ्या माणसाला आता पुन्हा खुर्ची हवी आहे . जर खुर्ची मिळाली तर पूर्वी मस्जिदच्या जागा खपवल्या उद्या मस्जिद विकू नयेत . ना अल्लाहची ना समाजाची भीती त्यांना राहिली आहे स्वार्थाने पछाडलेल्या माणसाचे पाप पूर्ण समाज उघड्या डोळ्याने पाहत आहे . खा बजरंग सोनवणे यांनी सदरील प्रश्न देशाच्या कचेरीत नेण्याचे ठरवले आहे यातून दोषींना कुणीही वाचवू शकत नाही असे या लढ्याचे लढवय्ये जेडी शहा आणि एजाज मेम्बर यांनी पत्रकातून म्हटले आहे.

# पांडे गल्लीतील कारवाईत १४ जुगारी ताब्यात ४ लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

शहरातील अवैध धंद्यांविरोधात पोलिसांची कारवाई सुरू असून, हिरालाल चौक परिसरातील पांडे गल्ली येथे सुरू असलेल्या पत्त्यांच्या जुगार अड्ड्यावर सोमवारी (दि. २१) पहाटे छापा टाकण्यात आला. डीवायएसपी वेंकटराम यांच्या पथकाने केलेल्या या कारवाईत १४ जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून रोख रक्कम, जुगाराचे साहित्य व इतर साहित्य असा एकूण ४ लाख २२ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पांडे गल्ली येथे काही जण पैशांची हार-जीत लावून पत्त्यांवर जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीची खातरजमा केल्यानंतर पथकाने छापा टाकून ही कारवाई केली.

या प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ०२९५/२०२६ नुसार महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ मधील कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि डीवायएसपी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. पोलीस उपनिरीक्षक सय्यद, पोलीस अंमलदार राहुल शिंदे, अशोक दराडे, अविनाश सानप, कुलदीप औसरमल, शशिकांत ढाकणे आणि विशाल जगताप यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# सत्ताधारी गटातील दोन माजी आमदारांचा दुष्काळी मोर्चा; आष्टीत राजकीय चर्चेला उधाण

आष्टी । प्रतिनिधी

पावसाने दडी मारल्याने आष्टी विधानसभा मतदारसंघातील खरीप पिके वाया गेली असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत असतानाच, सत्ताधारी महायुतीतीलच दोन माजी आमदारांकडून दुष्काळाच्या प्रश्नावर मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याने आष्टीच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.




आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव धोंडे आणि माजी आ.बाळासाहेब आजबे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ रोजी बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर दुष्काळी मोर्चा काढण्यात येणार असल्याचे फलक आष्टी शहरात झळकले आहेत. विशेष म्हणजे दोन्ही माजी आमदार हे सत्ताधारी महायुतीतील स्व.अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेसशी संबंधित आहेत.

सत्ताधारी गटातीलच नेत्यांना मोर्चाची वेळ का?

एकीकडे राज्यात सत्ताधारी पक्षाचे सरकार असताना आणि त्याच सरकारमधील घटक पक्षाशी संबंधित दोन माजी आमदार दुष्काळी मागण्यांसाठी थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत असल्याने स्थानिक राजकीय चर्चेला वेगळे वळण मिळाले आहे.


सरकार दरबारी मांडलेल्या मागण्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही का? स्थानिक पातळीवरील प्रश्न वरिष्ठांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोर्चाचा मार्ग स्वीकारण्याची वेळ का आली? असे सवाल आष्टी विधानसभा मतदारसंघात उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे या मोर्चाच्या फलकांची आष्टी शहरात सध्या चवीने चर्चा सुरू असून, सत्ताधारी गटातीलच माजी लोकप्रतिनिधी सरकारचे पान ३ वर

# श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, गढी येथे कबड्डी च्या कुमार गट व कुमारी गट अंजिक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन, बीड आयोजित कुमार गट व कुमारी गट जिल्हा अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन मंगळवार दिनांक २३ सप्टेबंर २०२६ रोजी गढी ता.गेवराई येथे श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आल्या आहेत.



या स्पर्धेचे उदघाटन मंगळवार दि. २३ सप्टेबंर २०२६ रोजी सकाळी ठिक १०:०० वाजता युवा नेते मा.श्री.रणवीर (काकासाहेब)अमरसिंहजी पंडित,व आदि मान्यवरांच्या शुभहस्ते उदघाटन होणार आहे. सदरील स्पर्धेत बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त क्रिडा मंडळे व कबड्डी खेळाडूनी सहभाग घ्यावा.


या अंजिक्यपद निवड चाचणी स्पर्धेत सहभाग घेताना राज्य कबड्डी असोसिएशन ने घालुन दिलेल्या नियमांचे पालन करावे. कुमार,कुमारी गटातील खेळाडूने वयाचे प्रमाणपत्र, ओळखपत्र,वजन या सर्व गोष्टी तंतोतंत पाळाव्यात कोणतेही दस्तऐवज खाडाखोड केलेले चालणार नाहीत. ज्या खेळाडूकडे राज्य कबड्डी असोसिएशनने घालुन दिलेल्या नियमानुसार कागदपत्राची पुर्तता होणार नाही त्या खेळाडूला या स्पर्धेत खेळवले जाणार नाही.या निवड चाचणी स्पर्धेतुन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संघ निवडला जाणार आहे.विरार पश्चिम ता.वसई जि. पालघर येथे दिंनाक ८ सप्टेबंर ते ११ सप्टेबंर २०२६ या कलावधीत म्हाडा मैदान, विरार पश्चिम ता.वसई जि. पालघर येथे होणाऱ्या ५३ व्या कुमार गट व कुमारी गट राज्य अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे.सदरील संघामध्ये आपले क्रिडा नैपूण्य दाखवुन राज्यस्तरीय स्पर्धेचे नेतृत्व करण्यासाठी निवड केली जाणार आहे.याची सर्व क्रिडा मंडळे व खेळाडूनी नोंद घ्यावी.सदरील निवडचाचणी स्पर्धा गढी येथील शिवछत्र इनडोअर स्टेडियम व खुल्या मैदानावर होणार आहेत. कुमार गट वयोमर्यादा पान ३ वर

# बीडसह पाच तालुक्यांतील कृषी अनुदानातील गैरप्रकारांची चौकशी करा; अखिल भारतीय मराठा महासंघाची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड, गेवराई, शिरूर कासार, पाटोदा व अन्य तालुक्यांमध्ये कृषी विभागाच्या विविध योजनांमधून देण्यात येणाऱ्या अनुदानात कथित गैरप्रकार होत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय मराठा महासंघ, बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी करण्यात आली आहे.जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके आणि मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोळे यांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनानुसार, महाडीबीटी लॉटरीअंतर्गत कृषी अवजारे, ट्रॅक्टर,



थ्रेशर, पॉवर टिलर, पॉवर वीडर, शॉप कटर आदी अवजारांसाठी लाभार्थ्यांना अनुदान दिले जाते. मात्र, या प्रक्रियेत पात्र लाभार्थ्यांना अनुदानापासून वंचित ठेवले जात असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.निवेदनात पॉवर वीडरच्या अनुदानाबाबत विशेष आरोप करण्यात आले आहेत. काही अधिकाऱ्यांकडून जवळच्या नातेवाईकांना व्यावसायिक प्रमाणपत्रे काढून देऊन हलक्या दर्जाच्या पॉवर वीडरची किंमत अधिक दाखवली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, शासनाच्या निधीचा गैरवापर करून शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात संबंधित दुकानांची तपासणी करून सर्वाधिक पॉवर वीडर विक्री करणाऱ्या दुकानदारांची चौकशी करावी, अशी मागणी महासंघाने केली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांचीही चौकशी करून दोष आढळल्यास शासन स्तरावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यापूर्वी १४ नोव्हेंबर २०२५ रोजी पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26